

पनवेल : बांगलादेशमधील हिंदूंवर होणाऱ्या अन्याय-अत्याचाराचा मंगळवारी मानवाधिकार दिनानिमित्त भाजप मध्यवर्ती कार्यालयात काळ्या फिती बांधून निषेध नोंदविण्यात आला. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, शहर उपाध्यक्ष अमित ओझे, केदार भगत, रूपेश नागवेकर, प्रीतम म्हात्रे, मधुकर मुंबईकर, जितेंद्र वाघमारे, हरू भगत आदी उपस्थित होते.

रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक १४५
www.ramprahar.com

# राम प्रहर

बुधवार, ११ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

भरधाव कार गॅरेजमध्ये घुसली; तिघे गंभीर/२
'रायगड किल्ल्याच्या कामासाठी समन्वय राखावा'/६
रायगडचा क्रिकेटपटू ऋषिकेश नाईक निवृत्त/८

## हिंदूंवरील अत्याचाराविरोधात पनवेलमध्ये मानवी साखळीद्वारे जोरदार निदर्शने

# बांगलादेश सरकारचा तीव्र निषेध





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचाराविरोधात सकल हिंदू समाज रायगडच्या वतीने मंगळवारी (दि. १०) जागतिक मानवाधिकार दिनी पनवेलमध्ये मानवी साखळीद्वारे जोरदार निदर्शने करून बांगलादेश सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला. बांगलादेशातील हिंदू समाजावर होत असलेला अत्याचार तातडीने थांबवण्याची मागणी या वेळी करण्यात आली. पनवेल रेल्वेस्थानक ते पनवेल बसडेपो अशा मार्गाने हजारोंच्या संख्येने मानवी साखळी करत हे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, दीपक बेहेरे, तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, प्रल्हाद केणी, भूपेंद्र पाटील, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, संतोष शेट्टी, मनोज भुजबळ, एकनाथ गायकवाड, राजू सोनी, अरुणकुमार भगत, तेजस कांडपिळे, अभिमन्यू पाटील, अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, नीता माळी, नेत्रा पाटील, माजी पं.स. सदस्य निलेश पाटील, महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, वर्षा प्रशांत ठाकूर, स्वाती कोळी, संजय जैन, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, अमित जाधव, किशोर सुरते, युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, दिनेश खानावकर, भाजप कामोठे अध्यक्ष रवी जोशी, रूपेश नागवेकर, प्रीतम म्हात्रे, विजय पाटील, बिना गोगरी, संध्या शारबिद्रे, अनेश ढवळे, हर्षवर्धन पाटील, केदार भगत, विद्या तामखडे, अनंत गायकवाड अविनाश गायकवाड, योगेश लहाने, डॉ. कृष्णा देसाई, भीमराव पोवार, अमोघ ठाकूर यांच्यासह विविध संस्था, संघटनांचा सहभाग मोठ्या प्रमाणात होता. या वेळी आंदोलनांच्या अनुषंगाने २५७० हिंदू बंधू-भगिनींनी आपली नोंद केली होती. या वेळी भारतमाता की जय, जय जय श्रीराम, बंद करा बंद करा अत्याचार बंद करा, एक है तो सेफ है अशा गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. त्याचबरोबर फलक दर्शवण्यात आले.

बांगलादेशामध्ये हिंदू व इतर अल्पसंख्याक समाजावर मुस्लिम कट्टरपंथीयांद्वारे अत्याचार होत आहेत. मंदिरे, घरे, दुकाने जाळली जात आहेत. तेथील हिंदू महिलांवरदेखील अमानवीय अत्याचार होत आहेत. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने याची दखल घ्यावी व तेथील मुंडा, चकमा, कुकी, बौद्ध इत्यादी, आदिवासी व दलित हिंदू बांधवांना इस्लामी कट्टरतावाद्यांच्या अमानवीय अत्याचारांपासून मुक्ती मिळावी, अशी मागणी आहे.

बांगलादेशचे सरकारदेखील हिंदूंसोबतच अन्य अल्पसंख्याकांवरील अत्याचारास मूक संमती देताना दिसून आले. बांगलादेशात अलीकडेच सत्तांतर झाले व महंमद युनूस यांच्या नेतृत्वात अराजक सरकार स्थापन झाले आहे. तेव्हापासून बांगलादेशातील अल्पसंख्याक हिंदू हे कट्टरपंथी मुस्लिमांच्या अत्याचाराचे बळी जात आहेत. हिंदू व इतर अल्पसंख्याक समुदायातील जनतेवर मुस्लीम कट्टरपंथीयांकडून होत असलेले हल्ले, हत्या, लूटमार, दरोडे, जाळपोळीच्या घटना, मुले व महिलांवरील अमानवीय अत्याचार भारतातील हिंदू समुदायाला चिंता करायला लावणारे आहेत. सर्व अत्याचाराचे प्रकार बांगलादेशातील सरकारी यंत्रणा व पोलीस यांच्या देखरेखीत घडताहेत हे अत्यंत दुर्दैवी आहे. संरक्षण यंत्रणा तिथल्या अल्पसंख्याकांना वाचवण्याऐवजी मूकदर्शक बनल्या आहेत. त्याचवेळी बांगलादेशमधील हिंदूंनी त्यांच्यावरील अन्याय, अत्याचारांनंतर आवाज उठवण्याचा प्रयत्न केला, मात्र तिथल्या सरकारने त्यांचा आवाज दाबून ठेवला आहे. तेथे हिंदूंनी आंदोलन करण्याचा प्रयत्न केला, मात्र बांगलादेशी सरकारने ही आंदोलने चिरडली. इस्कॉनचे हिंदू धर्मगुरु श्री चिन्मय दास यांना बेकायदेशीरपणे अटक करण्यात आली. त्यांच्या वकिलांची हत्या करण्यात आली. त्यांच्या समर्थकांना भारताचा व्हिसा असतानादेखील भारतात येण्यास मनाई करण्यात आली. या सर्व अत्याचारांची भारतातील हिंदू समाजास चिंता वाटत आहे. त्यामुळे तातडीने अत्याचार थांबण्याची सकल हिंदू समाजाच्या वतीने मानवी साखळीतून जोरदार मागणी करण्यात आली.

बांगलादेशातील हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधासाठी सर्व भाषिक, जातींचे, पंथांचे लोक, संघटना, नारीशक्ती असा सकल हिंदू समाज एकवटला होता. शिस्तबद्ध पद्धतीने मानवी साखळी तसेच जनसभा असा भव्य कार्यक्रम झाला.

## ॲड. आस्वाद पाटील यांचा शेकापला अखेरचा लाल सलाम!

### जिल्हा चिटणीस पदासह पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा

**अलिबाग : प्रतिनिधी**



शेतकरी कामगार पक्षाला त्यांच्या होम ग्राऊंडवर मोठा हादरा बसला आहे. ॲड. आस्वाद पाटील यांनी शेकापच्या जिल्हा चिटणीस पदाचा राजीनामा दिला आहे. त्याचबरोबर पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचाही त्यांनी त्याग केला आहे. आस्वाद पाटील हे शेकाप नेते जयंत पाटील यांचे भाचे आहेत. रायगडच्या पाटील कुटुंबातील गृहकलह यानिमित्ताने पुन्हा एकदा समोर आला आहे.

नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत जयंत पाटील यांच्या सुनबाई चित्रलेखा पाटील या शेकापच्या उमेदवार असतानाही त्यांचे भाचे आस्वाद पाटील, बंधू माजी आमदार पंडित पाटील हे प्रचारापासून दूर राहिले. निवडणूकीपूर्वीच त्यांनी चित्रलेखा पाटील यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. या निवडणुकीत चित्रलेखा पाटील यांना पराभवाचा सामना करावा लागला.

विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी संपल्यानंतर आता शेकापमधील कुटुंब कलह पुन्हा एकदा समोर आला आहे. माजी मंत्री मीनाक्षी पाटील यांचे चिरंजीव ॲड. आस्वाद पाटील यांनी जिल्हा चिटणीस पदासह पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे.

हॉटेल रविकिरण येथे मंगळवारी (दि. १०) आस्वाद पाटील यांच्या समर्थकांची बैठक झाली. या बैठकीत आस्वाद पाटील यांनी पक्षाचा राजीनामा देत असल्याचे जाहीर केले. या बैठकीला पक्षातील प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. ॲड. पाटील यांनी पक्षाच्या जिल्हा चिटणीस पदासह रायगड जिल्हा परिषदेचे उपाध्यक्षपद भूषवले आहे. त्यांनी पक्षाला दिलेली सोडचिठ्ठी हा शेकापला मोठा हादरा मानला जात आहे. आगामी काळात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत. त्यात शेकापला फटका बसेल.

## निवडक

### महाराष्ट्राचे माजी राज्यपाल एस.एम. कृष्णा यांचे निधन

**बंगळुरू** : कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री,



माजी केंद्रीय मंत्री आणि महाराष्ट्राचे माजी राज्यपाल सोमनाहल्ली मल्लैया (एस.एम.) कृष्णा यांचे निधन झाले आहे. त्यांनी मंगळवारी (दि. १०) पहाटे २.४५ मिनिटांनी बंगळुरूतील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. कृष्णा यांनी मार्च २०१७ साली काँग्रेसला रामराम करून भाजपमध्ये प्रवेश केला होता तसेच जानेवारी २०२३मध्ये त्यांनी सक्रीय राजकारणातून निवृत्तीची घोषणा केली होती. अनेकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

### आमदार टिळेकरांच्या मामाच्या हत्येप्रकरणी दोन संशयितांना अटक

**पुणे** : भाजपचे आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांचे सोमवारी अपहरण करून खून करण्यात आल्याची घटना घडली होती. या प्रकरणी पुणे पोलिसांनी दोन संशयितांना ताब्यात घेतले आहे. पवन शर्मा व नवनाथ गुरसाळे अशी त्यांची नावे आहेत. या दोघांना गुन्हे शाखेच्या कार्यालयात आणण्यात आले असून त्यांची सखोल चौकशी सुरू आहे.

## मुंबई बस अपघातातील मृतांचा आकडा सातवर

### आरोपी चालकाला पोलीस कोठडी



**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईतील कुर्ला परिसरात सोमवारी (दि. ९) रात्री घडलेल्या भीषण बस अपघातात मृत्युमुखी पडलेल्या नागरिकांची संख्या आता सात झाली आहे, तर अनेक जण जखमी आहेत. दरम्यान, आरोपी बसचालक संजय मोरे याला न्यायालयाने ११ डिसेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

नेहमी धावणारी मुंबई सोमवारी रात्री एका भीषण अपघाताने स्तब्ध झाली. बेस्टच्या इलेक्ट्रिक बसने अनेक वाहनांना धडक दिली. त्याचवेळी बसने काही पादचाऱ्यांनादेखील चिरडले. यामुळे परिसरात गोंधळ उडाला. पोलिसांनी संपूर्ण प्रकरणाचा तपास सुरू केला आहे.

### मृतांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत

या घटनेत मृत्यू झालेल्यांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे या घटनेत जे जखमी झाले, त्यांच्या उपचाराचा खर्च मुंबई महापालिका आणि बेस्टच्या वतीने करण्यासाठी आदेश देण्यात आले आहेत. मुख्यमंत्र्यांनी याबाबत सोशल मिडिया एक्सवर पोस्ट लिहून घटनेतील मृतांना श्रद्धांजली वाहिली आहे, तर जखमींच्या प्रकृतीत लवकर सुधारणा व्हावी अशी प्रार्थना केली आहे.

आरोपी चालक संजय मोरे याला ताब्यात घेऊन आरटीओकडून बसचा पंचनामा करण्यात आला. (पान २ वर..)

## ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनमध्ये कोणतीही तफावत नाही!

### विरोधकांच्या आरोपांना निवडणूक आयोगाचे पत्रकाद्वारे उत्तर

**मुंबई : प्रतिनिधी**



महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालानंतर महाविकास आघाडीकडून ईव्हीएमबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने मंगळवारी (दि. १०) एक पत्रक काढत महत्त्वाची माहिती दिली. विधानसभा निवडणूक मतमोजणीत सर्व २८८ मतदारसंघांमध्ये एकूण १४४० व्हीव्हीपॅटमधील स्लीप्सची अनिवार्य मोजणी २३ नोव्हेंबर रोजी पूर्ण झाली असून ईव्हीएममधील मतांची उमेदवारनिहाय संख्या आणि व्हीव्हीपॅट मशीनमधील उमेदवारनिहाय स्लीप्सची संख्या यात कोणतीही तफावत आढळली नाही, असा दावा निवडणूक आयोगाने स्पष्ट केले आहे.

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्रांच्या क्रमांकामधून लॉटरी पद्धतीने निवडलेल्या पाच मतदान केंद्रांवरील व्हीव्हीपॅट मशिन्सच्या स्लीप्सची मोजणी बंधनकारक आहे. या प्रक्रियेला उमेदवारांचे प्रतिनिधी उपस्थित असतात. ईव्हीएममधील प्रत्येक उमेदवाराच्या मतसंख्येशी व्हीव्हीपॅट स्लीप्सची संख्या पडताळणे हा या प्रक्रियेचा उद्देश आहे. महाराष्ट्र विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या मतमोजणीच्या वेळेस सर्व २८८ मतदारसंघांमध्ये एकूण १४४० व्हीव्हीपॅटमधल्या स्लीप्सची अनिवार्य मोजणी २३ नोव्हेंबर रोजी पूर्ण करण्यात आली आहे. मतमोजणीच्या दिवशी सर्व मतदारसंघांमध्ये प्रत्येकी पाच मतदान केंद्रांच्या क्रमांकाची सरमिसळ करून निवडणूक आयोगाच्या निरीक्षकांच्या समोर व उमेदवारांच्या मतमोजणी प्रतिनिधींच्या उपस्थितीत मतदान केंद्र निवडण्यात आली. या प्रक्रियेनुसार प्रत्येक विधानसभा मतदारसंघांमधील पाच मतदान केंद्रांतील मतमोजणीनंतर ईव्हीएममधील मतांची उमेदवारनिहाय संख्या आणि व्हीव्हीपॅट मशीनमधील उमेदवारनिहाय स्लीप्सची संख्या यामध्ये कुठेही तफावत आढळून आलेली नाही, असे अहवाल महाराष्ट्र राज्यातील सर्व म्हणजे ३६ जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाले आहेत. ही प्रक्रिया प्रत्येक मतमोजणी केंद्रात उपस्थित उमेदवारांच्या प्रतिनिधींसमोरच झालेली असल्याने संबंधित दस्तऐवजांवर या प्रतिनिधींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### संपूर्ण प्रक्रियेचे सीसीटीव्ही कव्हरेज व चित्रिकरण

व्हीव्हीपॅट स्लीप्सच्या मोजणीच्या या संपूर्ण प्रक्रियेसाठी प्रत्येक मतमोजणी केंद्रावर विशेष सुरक्षेची काळजी घेऊन स्वतंत्र कक्ष उभारण्यात आलेला होता आणि या संपूर्ण प्रक्रियेचे सीसीटीव्ही कव्हरेज तसेच चित्रिकरण करण्यात येऊन ते जतन केले गेले आहे. मतमोजणीच्या संदर्भातील भारत निवडणूक आयोगाच्या विहित प्रक्रियेनुसार प्रत्येक मतदारसंघाच्या पाच मतदान केंद्रांसाठीची व्हीव्हीपॅट स्लीपची गणना अनिवार्य असून ती पूर्ण झाल्याशिवाय मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होत नाही तसेच विजयी उमेदवार जाहीर करता येत नाही. राज्यातील सर्व २८८ मतदारसंघांमध्ये याबाबतच्या सर्व नियमांचे काटेकोर पालन करण्यात आले आहे, अशी माहितीही निवडणूक आयोगाने दिली.

## श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून विद्यार्थ्याला वैद्यकीय शिक्षणासाठी आर्थिक मदत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वैद्यकीय शिक्षणासाठी वैभव हनुमंत खुटले या विद्यार्थ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून तीन लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. हा धनादेश मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते व भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या प्रमुख उपस्थितीत सुपूर्द करण्यात आला.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीन दशकपेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणाऱ्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतःच्या पायावर उभे केले जाते. वैभव खुटले कामोठे येथील एमजीएम मिशन मेडिकल महाविद्यालयात वैद्यकीय शिक्षण घेणार आहे. त्यासाठी त्याला आर्थिक मदतीची आवश्यकता होती. त्यानुसार मदत करण्यात आली तसेच पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छाही देण्यात आल्या.

या वेळी भाजपचे तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, अनुसूचित सेल जिल्हाध्यक्ष अमित जाधव, भाजप जिल्हा चिटणीस अमरीश मोकल, मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी उपस्थित होते.

## सरपंच हत्येप्रकरणी दोन आरोपींना बेड्या

**बीड : प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांचे सोमवारी अपहरण करून हत्या करण्यात आली. यामुळे बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली असून देशमुख यांच्या नातेवाईकांनी आक्रमक पवित्रा घेत अहमदनगर-अहमदपूर महामार्गावर रास्ता रोको आंदोलन केले. दरम्यान, देशमुख यांच्या हत्येप्रकरणी सहा आरोपींपैकी दोन जणांना पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत.

संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर पोलिसांनी सहा पथके आरोपींच्या शोधासाठी स्थापन केली. धाराशिव आणि बीडमध्ये पथकांकडून आरोपींचा शोध घेतला जात आहे. केजजवळील तांबवा गावातील शिवारातून दोन आरोपींना अटक करण्यात आली आहे, अशी माहिती अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी दिली तसेच इतर आरोपींनाही लवकरच अटक करू. त्यामुळे ग्रामस्थांनी शांतता राखावी, असे आवाहन त्यांनी केले आहे.

## कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्यावर मंदिरच!

### जिल्हा व सत्र न्यायालयाचा निर्णय

**कल्याण : प्रतिनिधी**



कल्याणमधील ऐतिहासिक दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर आहे, हा शासनाचा त्या वेळचा निर्णय मान्य करत कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे वरिष्ठ विभागाचे न्यायाधीश ए.एस. लांजेवार यांनी दुर्गाडी किल्ल्यावरील मंदिराचा दावा मान्य केला. याशिवाय हे प्रकरण कल्याण न्यायालयातून वक्फ बोर्डाकडे वर्ग करण्याचा अन्य धर्मियांचा दावा न्यायालयाने फेटाळला.

मागील पन्नास वर्षांपासून दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर की मस्जिद हा दोन धर्मियांमधील दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात सुरू होता. यापूर्वी हा दावा ठाणे जिल्हा न्यायालयात सुरू होता. त्यानंतर हा दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयात वर्ग करण्यात आला. या संदर्भात माहिती देताना याचिकाकर्ते आणि हिंदू मंचचे अध्यक्ष दिनेश देशमुख यांनी माध्यमांना सांगितले की, १९७१मध्ये ठाणे जिल्हाधिकाऱ्यांनी दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर असल्याचे जाहीर केले होते. त्यानंतर या ठिकाणी मंदिर की मस्जिद असा एक चौकशी अर्ज दाखल करण्यात आला होता. या दाव्यात हिंदू समाजातर्फे ॲड. भाऊसाहेब मोडक यांनी बाजू मांडली. मस्जिदीला खिडक्या नसतात. येथे मंदिराला खिडक्या, मूर्ती ठेवण्यासाठी देवालय (चौथरा) आहे. त्यामुळे ही वास्तू मंदिर आहे, असे तेव्हा शासनाने जाहीर केले होते.

दुर्गाडी किल्ल्यावर मंदिर नसून मस्जिदच आहे, असा अर्ज ठाणे जिल्हा न्यायालयाकडे १९७५-७६मध्ये दाखल झाला. दोन वर्ष हा दावा सुरू होता. त्यानंतर हा दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाकडे वर्ग करण्यात आला. हा दावा कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयातून वक्फ बोर्डाकडे वर्ग करावा, अशी मागणी अन्य धर्मियांनी केली. (पान २ वर..)

# प्रत्येकाच्या हक्कांच्या रक्षणामुळे लोकशाही बळकट -राज्यपाल राधाकृष्णन

## राजभवन येथे आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त कार्यक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

लोकशाहीमध्ये प्रत्येक व्यक्तीच्या हक्कांचे रक्षण होणे गरजेचे आहे. आपण या तत्वाचे पालन करित असल्यानेच आपली लोकशाही बळकट असल्याचे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले. शाळा आणि महाविद्यालयांच्या अभ्यासक्रमांमध्ये मानवी हक्कांबाबतचे शिक्षण समाविष्ट करून युवकांमध्ये सहानुभूती आणि न्यायाची संस्कृती निर्माण करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी या वेळी नमूद केले.

राज्यपालांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन येथे राज्य मानवी हक्क आयोगामार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मुंबई उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश नरेश पाटील, आयोगाचे अध्यक्ष न्या. के.के. तातेड, आयोगाचे सदस्य एम. ए. सईद, संजय कुमार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन म्हणाले, अल्पसंख्याक, अनुसूचित जाती, जमाती, महिला, मुले, तृतीयपंथी




आणि दिव्यांग व्यक्तींचे हक्क हे आपल्या मानवाधिकार अजेंड्याच्या अग्रस्थानी राहिले पाहिजेत. प्रत्येक गट समाजासाठी महत्त्वपूर्ण योगदान देतो आणि त्यांना समानतेचे आणि आदराचे वातावरण मिळणे आवश्यक आहे.

हवामान बदल व अन्य नैसर्गिक घटक हेदेखील शेतकऱ्यांसमोरील आव्हानांचे व्यापक स्वरूप असल्याचे राज्यपाल राधाकृष्णन यांनी नमूद केले. शेतकऱ्यांसाठी समुपदेशन सेवा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो, असे त्यांनी सांगितले. मानवी हक्क आयोगाचे कार्य दुर्बल घटकांपर्यंत न्याय पोहोचविण्यात उपयुक्त ठरले असल्याचेही ते म्हणाले.

मानवी हक्क दिनाचा यावर्षीचा 'आपले हक्क, आपले भविष्य, आत्ता' हा विषय अत्यंत दूरदृष्टीपूर्ण असून मानवाधिकारांच्या आव्हानांवर तज्ज्ञांच्या व्याख्यानांचे आयोजन केल्याबद्दल राज्यपालांनी कौतुक केले. राज्य मानवी आयोग स्थापन झाल्यापासून, अशा असंख्य व्यक्ती आणि गटांसाठी तो आशेचा किरण ठरला असल्याचे सांगून राज्यभरातील व्यक्तींच्या सन्मान आणि हक्कांचे रक्षण करण्याचे राज्य मानवाधिकार आयोगाचे प्रयत्न प्रशंसनीय असल्याचेही राज्यपालांनी सांगितले.

प्रत्येक नागरिकाला आत्मसन्मानाने जगता येईल अशा संधी निर्माण करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, जागतिक हवामान बदलांना सामोरे जाणे याला आपण सर्वोच्च प्राधान्य द्यावे लागेल, असेही राज्यपाल राधाकृष्णन यांनी यावेळी नमूद केले.

मान्यवरांच्या हस्ते यावेळी आयोगाच्या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. न्या.तातेड यांनी प्रारंभी आयोगाच्या कार्याची माहिती दिली. तर, न्या. पाटील यांनी प्रत्येकाने आपल्या हक्कांचे जतन करतानाच इतरांच्या हक्कांचीही जाणीव ठेवण्याचे आवाहन केले.

यावेळी बांधावरील प्रयोगशाळा, आहार हेच औषध, महिला आणि मुलांची देह विक्रीबाबत जनजागृती, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरीक यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या माहितीवर तसेच आदिवासी भागातील समस्या आणि त्यांच्या हक्काबाबत जनजागृती करणारी दालने उभारण्यात आली होती, त्यांची राज्यपाल राधाकृष्णन यांनी पाहणी केली.

# भरधाव अलिशान कार थेट गॅरेजमध्ये घुसली; तिघे गंभीर

### अलिबागमधील चोंढी येथील घटना

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग – रेवस मार्गावर चोंढीजवळ भरधाव कार थेट गॅरेजमध्ये घुसून अपघात झाला. यात गॅरेजमालकासह तिघेजण गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर अलिबागच्या जिल्हा रूग्णालयात उपचार सुरू आहेत. चालकाचे गाडीवरील नियंत्रण सुटल्याने हा अपघात झाला.

रवी पाटील(वय ५०) रा. धोकवडे (गॅरेजमालक), मंगेश यशवंत म्हात्रे (वय ५२) रा. आगरसुरे, सोनू मधु नाईक (वय ४५) रा. किहीम अशी जखमींची नावे आहेत. सोमवारी संध्याकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास भरधाव



बीएमडब्ल्यू कार अलिबागकडून रेवसच्या दिशेने निघाली होती. चोंढी गावापासून जवळच डे फार्म हाऊस शेजारी असलेल्या गॅरेजच्या शेडमध्ये घुसली. यात दुरूस्तीसाठी आलेल्या दुचाकी वाहनांचेही नुकसान झाले.

अपघातानंतर काही काळ वाहतूक कोंडी झाली होती. मांडवा सागरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली जखमी झालेल्या तिघांना सामाजिक कार्यकर्त्यांच्या मदतीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी हलवले आणि वाहतूक पूर्ववत केली.

या प्रकरणी गुन्हा दाखल केला असुन चालक संदीप गायकवाड यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. अपघाताबाबत अधिक तपास मांडवा सागरी पोलीस ठाण्याचे निरीक्षक भोई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक खोत करीत आहेत.

# मॉर्निंग वॉक करणाऱ्याचा मोबाईल हिसकावला

**पनवेल :** वॉकिंग करणऱ्या ४५ वर्षीय व्यक्तीच्या हातातील मोबाईल अनोळखी व्यक्तीने हिसकावून नेल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

नितीन भंगाळे हे खारघर येथे राहत असून ते प्रशांत कॉर्नर ते पेठ पाडा येथील मेट्रो लाईनच्या रस्त्यालगत चालत होते. या वेळी रस्त्यावर सेक्टर ३१ येथे हातामध्ये मोबाईलवर पाहत वॉक करत असताना पाठीमागून स्कूटीवर दोन अनोळखी व्यक्ती आले व त्यांनी त्यांचा मोबाईल खेचून नेला.

# बांगलादेशातील हिंदूंच्या अत्याचाराचा पेणमध्ये निषेध

**नागोठणे : बातमीदार**

बांगलादेशातील हिंदू अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी कायदेशीर मार्गाने आंदोलन करणार्या बांगलादेशातील इस्कॉनचे प्रमुख स्वामी चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांना देशद्रोहाच्या आरोपाखाली केलेली अटक ही हिंदू अल्पसंख्याकांचे हक्क दडपण्याचा प्रकार आहे, आम्ही याचा निषेध करतो.

भारत सरकारने तातडीने पावले उचलून चिन्मय कृष्णदास ब्रह्मचारी यांची विनाअट सुटका व्हावी आणि हिंदू अल्पसंख्याकांच्या संरक्षणासाठी तेथील सरकारला भाग पाडावे, अशी मागणी हिंदू राष्ट्र समन्वय समितीच्या माध्यमातून रविवार दि.८ डिसेंबर रोजी पेण येथील शरद पवार भवन समोर, कोतवाल चौकात झालेल्या आंदोलनात करण्यात आली.

हिंदुराष्ट्रसमन्वय समिती'च्या



वतीने घेण्यात आलेल्या या आंदोलनात इस्कॉन, विश्व हिंदु परिषद, श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान,गोरक्षक मंगल पाटील गोशाळा, हिंदु जनजागृती समिती, सनातन संस्था आदी हिंदुत्वनिष्ठ संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते. आंदोलनात सहभागी झालेल्या हिंदूंनी हातात प्रबोधनपर फलक धरुन घोषणाही दिल्या. या वेळी केंद्र शासनाला देण्यात येणाऱ्या निवेदनावर लोकांच्या स्वाक्षर्या घेण्यात आल्या.

यावेळी हिंदू जनजागृती समितीचे सुनील कदम यांनी सांगितले की,प्रलय काळात याच इस्कॉनने नागरिकांना अन्न मिळावं त्यासाठी मंदिरामध्ये जेवण दिले होते. आज त्याच इस्कॉनच्या मंदिरांवर आक्रमण केले जात आहेत. जगात कुठेही हिंदूवर अन्याय-अत्याचार होत असेल तर त्यांच्या पाठीशी उभे राहणे आणि त्यांना न्याय मिळवून देणे आपल्या भारतातील हिंदूंचे कर्तव्य आहे या आंदोलनात इस्कॉनच्या साधिका मिनाक्षी पाटील, गोरक्षक मंगल पाटील अधिवक्ता म्हात्रे आणि दिघाटीचे माजी उपसरपंच रोहिदास शेडगे यांनी आपले विचार मांडले.

# महिलेस लाखोंचा गंडा

**नवी मुंबई :** ट्रेडिंगचा बहाण्याने महिलेची ९३ लाखांची फसवणूक झाल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

खारघर परिसरात राहणाऱ्या ४० वर्षीय महिलेसोबत हा प्रकार घडला. त्यांना ऑनलाइन ट्रेडिंग करून पैसे कमवण्याचा मेसेज आला होता. त्यावर विश्वास ठेवून त्यांनी लिंकला प्रतिसाद दिला असता त्यांना ट्रेडिंगमधून होणाऱ्या नफ्याची माहिती दिली. त्यांनी टप्प्याटप्प्याने संबंधितांच्या सांगण्याप्रमाणे त्यांच्या खात्यावर ९३ लाख रुपये पाठवले, तरीही अधिक रकमेची मागणी झाली.

शिवाय त्यांनी गुंतवलेली रक्कम परत काढण्याचा प्रयत्न करूनही त्यांना ती काढता आली नाही. यावरून आपली फसवणूक झाल्याचे त्यांच्या लक्षात येताच त्यांनी सायबर पोलिसांकडे तक्रार केली. त्यावरून अज्ञातांवर गुन्हा दाखल केला आहे.

# खालापूर तहसील आवारात बेशिस्त वाहनांवर कारवाई, ७५०० रुपये दंड वसूल

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तहसील आवारात बेशिस्त वाहन पार्किंग करणाऱ्या वाहन चालक मालक यांच्यावर आज दंडात्मक कारवाई करण्यात आली त्यांचेकडुन ७५०० रुपये दंड वसुल करण्यात आला

खालापूर तहसील आवारात तहसिल व ट्रेझरी कार्यालय, सेतू सुविधा केंद्र, भूमी अभिलेख, तलाठी व मंडळ अधिकारी कार्यालय,कारागृह, वन विभाग यांची इमारत आणि खालापूर पोलीस ठाणे अशी कार्यालये आहेत. या कार्यालयात अनेक नागरीक आपल्या शासकीय कामांसाठी येत असतात, या सर्वांकडे स्वतःची नसतात

मात्र या कार्यालयाच्या आवारात प्रशस्त जागा उपलब्ध आहे.या प्रशस्त जागेतून तहसिल कार्यालयात जाण्याचा मार्ग आहे. या आवारात तहसीलदार



खालापूर यांच्या गाडी सह इतर अधिकारी यांची वहाने ऊभी असतात,वरीष्ठ अधिकारी, लोक प्रतिनिधी हे देखील त्यांची वहाने तहसिल कार्यालया समोर उभी करतात. तहसील कार्यालयात जाण्याच्या मार्गावर अनेक वाहने ऊभी असल्याने तहसीलदार, वरिष्ठ अधिकारी, लोक प्रतिनिधी यांच्या गाड्यांना अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कधी कधी वरिष्ठ अधिकारी चालत कार्यालयात जातात.

याबाबत वारंवार तक्रारी आल्याने अनेक वेळा वाहन चालकाला समजून सांगण्याचा प्रयत्न देखील झाला आहे, मात्र याबाबत कधीच शिस्त बाळगण्यात आली नाही. खालापूर पोलीस ठाण्याचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी मुख्याधिकारी नगर पंचायत खालापूर यांना दि. १० रोजी वाहन पार्किंग साठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी पत्र दिले असून पे अँड पार्क सेवा उपलब्ध करून देण्यात कळविले आहे. त्याची प्रत खालापूर तहसीलदार यांना ही दिली आहे. .त्यावर देखील काहीही कार्यवाही झाली नाही

विशेष म्हणजे खालापूर परीसरातील औद्योगिक वसाहतीत जाणारे कामगार तहसिल कार्यालयाच्या आवारात गाड्या पार्क करून कामावर जातात आणि सायंकाळीं येऊन आपल्या गाड्या घेऊन जातात, असे पोलिसांच्या निदर्शनास आले आहे. त्यामुळे येणाऱ्या नागरिकांना याचा त्रास होतो,

आज खालापूर पोलिसांनी वाहतूक पोलिसांची मदत घेऊन तेरा गाडी मालकांवर कारवाई करून सात हजार पाचशे रुपये दंड म्हणून वसूल केले. जर येणाऱ्या नागरिकांना वाहन पार्किंग ची सोय उपलब्ध न झाल्यास त्यानी किती वेळा दंड भरायचा? त्यामुळे नगर पंचायत यांनी जागा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत अशी मागणी होत आहे.

पान १ वरुन

## मुंबई बस अपघातातील मृतांचा आकडा सातवर

अपघात झालेली बस वातानुकूलित असून कुर्ला रेल्वेस्थानक (पश्चिम) येथून साकीनाकाकडे जात होती. डॉ. आंबेडकर नगर परिसरात चालकाचा बसवरील ताबा सुटल्याने वेग वाढला आणि हा प्रकार घडला. या अपघातात चार पोलिसांसह एकूण ४९ जण जखमी झाले असून त्यापैकी सात जणांचा मृत्यू झाला आहे. जखमींवर उपचार सुरू आहेत.

कुर्ला पोलिसांनी सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवत बेस्ट बस चालक संजय मोरे याला अटक केली होती. त्याला मंगळवारी (दि. १०) कुर्ला न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने संजय मोरेला ११ दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.

या अपघाताबाबत माहिती देताना बेस्टचे महाव्यवस्थापक अनिल डिग्गीकर म्हणाले की, तत्काळ दोन समित्या स्थापन केल्या आहेत. त्या अहवाल देतील. आम्ही दोन लाख रुपये मृतांच्या नातेवाईकांना देणार आहोत तसेच जखमींच्या उपचाराचा पूर्ण खर्च करू.

## कल्याणच्या दुर्गाडी किल्ल्यावर मंदिरच!

ही मागणी फेटाळत न्यायालयाने दुर्गाडी किल्ला येथे मंदिरच आहे, असे सांगत शासनाचा यापूर्वीचा निर्णय मान्य केला, असे याचिकाकर्ते देशमुख यांनी सांगितले. या प्रकरणात हिंदू समाजातर्फे ॲड. भिकाजी साळवी, ॲड. सुरेश पटवर्धन, ॲड. जयेश साळवी, सरकार पक्षातर्फे ॲड. सचिन कुलकर्णी यांनी काम पाहिले.

शिवकाळापासून दुर्गाडी किल्ल्याला इतिहास आहे. हिंदवी स्वराज्याचे पहिले आरमार कल्याणमध्ये सुरू झाले. पूर्वीपासून या ठिकाणी हिंदू समाजाचा हक्क होता. तो न्यायालयाच्या निर्णयामुळे आता मान्य झाला आहे, असे कल्याणच्या इतिहासाचे अभ्यासक डॉ. श्रीनिवास साठे यांनी सांगितले.

# 'अमृत'च्या आर्थिक साक्षरता प्रशिक्षण योजनेसाठी संकेतस्थळावर अर्ज उपलब्ध

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र संशोधन, उन्न्ती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या स्वायत्त संस्थेद्वारे अमृतच्या लक्षित गटातील उमेदवारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम ही योजना जाहीर करण्यात आली आहे.

या संस्थेच्या आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ठरविण्यात आलेल्या लक्षित गटाच्या १८ ते ६० वयोगटातील उमेदवारांना 'प्रथम येयील त्यास प्रथम प्राधान्य' या तत्वावर प्रवेश मिळण्याकरीता अमृतच्या संकेतस्थळावर अर्ज करावेत, अशी माहिती अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी दिली.

आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमातून लाभार्थ्यांची वैयक्तिक तसेच कौटुंबिक आर्थिकस्थिती सुधारणे, स्वयंरोजगाची निर्मिती, प्रशिक्षणामार्फत लाभार्थ्यांनी इतर गरजू समाज घटकांची आर्थिकस्थिती सुधारण्यास मदत करावी ही अपेक्षित सकारात्मक उद्दिष्टे लक्षात घेऊन शासनाद्ववारे महाराष्ट्र संशोधन, उन्न्ती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) ही योजना राबविण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत अव्वल ५० प्रशिक्षणार्थ्यांची प्रमाणपत्र परीक्षा शुल्क माफ करण्यात येणार आहे. आर्थिक साक्षरतेच्या माध्यमातून आर्थिक सक्षमीकरण करणाऱ्या या online योजनेचा (Wealth Management) अभ्यासक्रम हा १.Basic Financial Services Knowledge (२ महिने), २. Professional Grooming Personality development. (१ महिना), ३. Market Application Employability Skills.(१ महिना) या तीन टप्प्यात आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रम ही योजना असेल.

अमृतच्या लक्षित गटातील १८ ते ६० वयोगटाच्या उमेदवारांना या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेता येईल. प्रथम येईल त्यास प्राधान्य या तत्त्वाने प्रवेश देण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी चार महिने राहील, शिक्षणाची भाषा इंग्रजी आणि मराठी राहील. लाभार्थीचे पदवी परीक्षा उत्तीर्ण किंवा पदवी परीक्षा (अंतिम वर्ष) शिक्षण चालू असणे अपेक्षित आहे. लाभार्थ्यांना डिजिटल स्वरूपामध्ये शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येईल.

या अभ्यासक्रमामध्ये Mutual Funds, SIP, SWP, Stock Market, Insurance इत्यादी गुंतवणूकी संबंधित माहितीचे ऑनलाईन पद्धतीने प्रशिक्षण दिले जाईल. भारतीय रिझर्व बँक (RBI), SEBI सारख्या विविध भारतीय वित्तीय संस्थांची माहिती देण्यात येईल.

प्रशिक्षण कालावधी पूर्ण झाल्यानंतर प्रशिक्षणार्थी NISM-5A, IRDAI सारख्या प्रमाणन परीक्षे करीता अर्ज करू शकतील. या प्रमाणन परिक्षेच्या पूर्व तयारीसाठी प्रशिक्षणार्थीकरीता सराव परीक्षा घेण्यात येतील. प्रशिक्षणार्थ्यांपैकी पहिल्या अव्वल ५० गुणवंत विद्यार्थ्यांचे NISM²–5A, IRDAI या प्रमाणन परीक्षेचे परीक्षा शुल्क हे संस्थे मार्फत बक्षीस स्वरूपी परत देण्यात येईल.

इच्छुक उमेदवारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी www.mahaamrut.org.in या 'अमृत' संस्थेच्या संकेतस्थळाला भेट द्यावी तसेच https://app.mahaamrut.org.in/amrut/choose-login या लिंक वर जाऊन अर्ज करावा व आवश्यक ते सर्व कागदपत्र अपलोड करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

अमृतच्या आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांनी एका प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे.

# आमदार गोपीचंद पडळकर यांनी केली कार्यकर्त्यांची विचारपूस

**चौक : प्रतिनिधी**

भाजपा महाराष्ट्र राज्य प्रवक्ते, जत विधानसभा मतदार संघातून निवडून आलेले आमदार गोपीचंद पडळरांनी मुंबई येथून मतदार संघात जाताना खंडाळा घाटातील चावणी गावातील कार्यकर्त्यांची विचारपूस केली.

आमदार गोपीचंद पडळकर हे आज मुंबई कडून पुण्याकडे जातं असताना त्यांनी दस्तुरी येथे कार्यकर्त्यांची भेट घेतली यामध्ये खालापुर तालुक्यातील चावनी सरपंच बाळासाहेब आखाडे आणि आत्करगावष्चे माजी सदस्य दत्ताभाऊ शेडगे यांचा समावेश होता.

यावेळी दत्ता शेडगे यांनी आमदार गोपीचंद पडळकर यांचे स्वागत केले.सांगली जिल्हातील जत विधानसभा मतदार संघातून कॉंग्रेसचे



उमेदवाराचा आडोतीस हजारांनी दारुण पराभव करत भाजपचे गोपीचंद पडळकरांनी दणदणीत विजय मिळवला आहे. आपल्या व्यस्त कामकाजात कार्यकर्त्यांची आठवण ठेवणे सगळ्यांना जमत नाही, त्यांनी व्यस्त असताना बोलावले, त्यामुळे कार्यकर्ते देखिल भाऊक झाले.

# कै. हरिश्चंद्र पाटील, कै. अनुसया पाटील यांच्या स्मरणार्थ कोळखे येथे विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कोळखे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कै. हरिश्चंद्र पाटील यांची ३१वी, तर त्यांच्या पत्नी कै. अनुसया पाटील यांचा १७वी पुण्यतिथी कार्यक्रम १२ डिसेंबर रोजी होणार असून त्या निमित्ताने विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमे आयोजित करण्यात आली आहे.

कोळखे गावातील आई बंगलो येथे सकाळी ११ वाजता गायिका संध्या घाडगे यांचे स्वरांजली कार्यक्रम, दुपारी १२ वाजता प्रतिमेचे पूजन, सायंकाळी ४ वाजता जय हनुमान महिला हरिपाठ मंडळ कोळखे यांचे हरिपाठ, सायंकाळी ६ वाजता भजनसम्राट बाळासाहेब वाईकर(नगर) आणि भजनसम्राट जगन्नाथ वाडेकर (पंढरपूर) यांची चक्रीभजन जुगलबंदी होणार आहे. त्यानंतर रात्री ९ वाजता जय हनुमान प्रासादिक वारकरी भजन मंडळ पालीखुर्द आणि रात्री ११ वाजता श्री हनुमान प्रासादिक वारकरी भजन मंडळ कसलखंड यांचे डबल बारी वारकरी आणि अभंग- गोंधळ होणार आहे.

या कार्यक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन प्रकाश पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य व जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक आजिवली विद्यालय समितीचे अध्यक्ष राजेंद्र पाटील, बाबुराव पाटील, विश्वनाथ पाटील व कुटुंबीयांनी केले आहे.

# पनवेलमध्ये हत्तीरोग दुरीकरण मोहीम

## पालिका कार्यक्षेत्रात ९ ते १४ डिसेंबरपर्यंत औषधोपचार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हत्तीरोग बाधित नसलेल्या जिल्ह्यात हत्ती रोग दूरीकरणासाठी सार्वत्रिक औषधोपचार मोहिम राबवून त्याअंतर्गत रात्र रक्त नमुने संकलन सर्वेक्षणाबाबत मार्गदर्शक सुचना केंद्रशासनाच्यावतीने देण्यात आल्या आहेत. त्यानूसार आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात ९ डिसेंबर ते १४ डिसेंबर पर्यंत ही मोहिम राबविण्यात येणार आहे.




हत्तीरोग बाधित नसलेल्या जिल्ह्यातील पाच लाख लोकसंख्येप्रमाणे होणाऱ्या या मोहिमेमध्ये ब्लॉक्सनूसार रात्र रक्त नमुने संकलन सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या अनुंषगाने पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १४ कामोठे नौपाडा, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र १० रोहिंजण, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र तळोजा फेज २ पाचनंद, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र खांदा कॉलनी टेंभोडे-पडघे या विभागाची निवड करण्यात आली असून येथील रात्र रक्त नमुने संकलन करण्यात येणार आहे. या शहरी भागांमधून हत्तीपाय आणि अंडवृध्दी रुग्णांची सर्वाधिक संख्या असलेला एक भाग निवडण्यात येणार आहे. तसेच मागील फेऱ्यांमधील, नकाराचे उच्च दर असलेले क्षेत्र, झोपडपट्ट्यांचे प्रभाग, मोठ्या स्थलांतरित लोकसंख्येच्या वसाहती असलेली क्षेत्राची निवड करण्यात येणार असल्याची माहिती मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ.आनंद गोसावी यांनी दिली आहे.

ही मोहिम ९ डिसेंबर ते १४ डिसेंबर २०२४ या कालावधित राबविण्यात येत आहे. दररोज एक टीम ५० रात्र रक्तनमुने घेऊन आणि ते सर्वात नजीकच्या प्रशिक्षित प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी यांचेकडून तपासून घ्यावेत. हत्तीरोग दूषित रुग्णांना स्थानिक वैद्यकीय अधिकारी यांचे देखरेखीखाली समूळ उपचार द्यावेत.

**प्रत्येक भागासाठी दोन टीम**

*या मोहिमेंतर्गत निवडलेल्या प्रत्येक भागासाठी दोन टीम तयार करण्यात येणार आहेत. प्रत्येक टीम मध्ये दोन आरोग्यसेवक असणार आहेत. या टीमच्या माध्यमातून स्थानिक आरोग्य सेविका व आशा यांचे सहकार्य घेऊन रात्री ८ ते १२ यावेळेत रात्र रक्तनमुने घेण्यात येणार आहे.*

तसेच रात्र रक्तनमुने तापसणीचा अहवाल दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजेपर्यंत या कार्यालयास अहवाल त्वरित सादर करण्याचे आदेश शासनाकडून देण्यात आले आहे.

# खारघरच्या प्रदूषणवाढीसंदर्भात निवेदन

## नेत्रा पाटील यांनी आयुक्तांसमोर मांडल्या समस्या

**खारघर : रामप्रहर वृत्त**

बांधकाम व्यावसायिकांकडून होणाऱ्या नियमांचे उल्लंघन व त्यामुळे झालेल्या प्रदूषण वाढीबाबत पनवेल महापालिकेच्या प्रभाग क्रमांक ४च्या माजी नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांना निवेदन दिले.




खारघर शहरात तसेच परिसरात अनेक दिवसांपासून नागरिक प्रदूषणामुळे त्रस्त आहेत. प्रदूषणामुळे परिसरातील विशेषता ज्येष्ठ नागरिक तसेच ज्यांना दमाचा आजार आहे अशा रहिवाशांना मोठ्या प्रमाणात वायू, ध्वनी प्रदूषणामुळे त्रास होत आहे.

नेत्रा पाटील यांनी निवेदनात म्हटले आहे की, खारघर शहरात सर्वच सेक्टरमध्ये मोठ्या प्रमाणात बांधकाम सुरू आहेत. बांधकाम व्यावसायिक हे महापालिकेने तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या नियमांची पायमल्ली करत असल्याचे रहिवाशांच्या तक्रारी आहेत. बांधकाम व्यवसायिकांकडून मोठ्या प्रमाणात धुळीचे कण, हवेत विरघळणारी विषारी रसायने इत्यादी घटकांमुळे होणारे हवेचे प्रदूषण मोठ्या प्रमाणात केले जात असल्याचा रहिवाशांचा आरोप आहे. शहरात वायु ध्वनी आणि जल प्रदूषण करणाऱ्यांवर थेट दंडात्मक कारवाईला सुरुवात दिसून येत नसल्यामुळे सर्वसामान्य रहिवाशी व मालमत्ता कर धारक हे पनवेल महापालिकेवर प्रचंड नाराज असल्याचे दिसते.

बांधकाम व्यावसायिकांनी त्यांच्या बांधकामा भोवती १८ मीटर उंचीची हिरव्या रंगाची जाळी अच्छादित केलेली नसल्याचे तसेच हवेत उडणाऱ्या धुळीच्या कणांवर नियंत्रण मिळविण्याकरिता पाण्याचे तुषार उडवणे बंधनकारक आहे परंतु कोणीही या नियमांचे पालन करत नसल्याचे दिसून येते म्हणजेच त्यांच्यावर महानगरपालिकेचा कुठलाही अंकुश नाही, असे सर्वसामान्य नागरिक खासगीत बोलतात.

पनवेल महानगरपालिकेचे अधिकारी अथवा संबंधित प्रभाग अधिकारी हे फक्त आपल्या वातानुकूलित दालनात दिवसभर बसून असतात असा आरोप देखील सर्वसामान्य रहिवासी करत आहेत. ते कुठल्याही प्रकारे बांधकाम व्यावसायिकांच्या स्थळांची प्रत्यक्ष पाहणी करत नाहीत त्यामुळे त्यांना धुळीचे व हवेचे प्रदूषण कसे दिसेल, असे नागरिक विचारत आहेत. वरील सर्व बांधकाम व्यवसायिक पनवेल महानगरपालिकेच्या नियमांची नियमावली न पाळता बांधकाम करत आहेत, अशा बांधकाम व्यवसायिकांवर तात्काळ कारवाई करत त्यांचे बांधकाम त्वरित थांबवण्यात यावे, अशी समस्त नागरिकांची मागणी आहे.

प्रदूषणाचा विळखा मोठ्या प्रमाणात वाढून नागरिक आजारी पडत आहेत अनेक तज्ञ डॉक्टरांचे याबाबत मत व्यक्त करण्यात आलेले आहे. आपण याची नोंद घ्याल व त्वरित कारवाई करावी. निवेदन देताना खारघर मंडल भाजपा उपाध्यक्ष किरण पाटील यांच्यासहित माजी नगरसेवक निलेश बाविस्कर हेदेखील उपस्थित होते.

# उरण ओएनजीसीतर्फे रक्तदान शिबिर

**उरण : बातमीदार**

रक्तदानाविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने व गोरगरिबांना वेळेत रक्ताची उपलब्धता व्हावी या अनुषंगाने ओएनजीसी उरण प्लांट पुरस्कृत आणि ओएनजीसी स्थानीय लोकाधिकार समिती व ओएनजीसी (डब्ल्यू.ओ.यु.) कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार, १३ डिसेंबर २०२४ रोजी ओएनजीसी ए पी यु मेन गेट, द्रोणागिरी भवन, उरण येथे सकाळी ७ ते सायंकाळी ६ या वेळेत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.



सालाबाद प्रमाणे होणाऱ्या यावर्षी रक्तदान शिबिराचे ३६ वे वर्ष असून, मागील वर्षी २० डिसेंबर २०२३ रोजी झालेल्या रक्तदान शिबीरात एका दिवसात तब्बल '९४८ युनिट' विक्रमी रक्तदान संकलन केले होते. या रक्तदान शिबिरात मुंबई व नवी मुंबई मधील नामांकित रुग्णालयातील रक्तपेढ्यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे.

या कार्यक्रमास उरण संयंत्राचे समूह महाव्यवस्थापक व संयंत्र व्यवस्थापक डि.के. त्रिवेदी, मुख्य महाव्यवस्थापक (उत्पादन) आधारभूत सेवा संदीप कुमार चांद, महाव्यवस्थापक प्रभारी मानव संसाधन भावना आठवले मॅडम यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. रक्तदान करणे ही काळाची गरज आहे. रक्तदानासारख्या सामाजिक उपक्रमात सहभागी होऊन देशकार्याला हातभार लावावा. रक्त दात्यांनी रक्तदानाला येताना कोणतेही एक ओळखपत्र (आधारकार्ड, पॅनकार्ड, मतदान कार्ड, काम करीत असलेल्या कंपनीचे ओळखपत्र) सोबत आणावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी नागरिकांनी, रक्तदात्यांनी ओएनजीसी (डब्ल्यू.ओ.यु.) कर्मचारी संघटना, उरण प्लांटचे उपाध्यक्ष मनोहर थळी ९९६९२२७९५०, सचिव बाळकृष्ण काशिद ९९६९२२७९५१ /८१६९८३१५७५, सचिव उज्जेश तुपे ८२९१२८१६९७, ९७६४१६५४२७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# तळोजे मजकूरमध्ये शनिवारपासून श्री गुरुचरित्र पारायण सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सदगुरु वामनबाबा महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या भूमीत श्री नवनाथ सेवा मंडळ योगीनगर धोंडली यांच्यावतीने 'श्री गुरुचरित्र पारायण सोहळा व श्री दत्तजयंती उत्सव' आयोजित करण्यात आला आहे. ७ डिसेंबरला सुरू झालेल्या उत्सवाची परिसंगता १५ डिसेंबर रोजी होणार आहे.



या महोत्सवानिमित्त तळोजे मजकूर योगिनीनगर (धोंडळी) येथील श्रीस्वामी समर्थ मठ मंदिर येथे बुधवार ११ डिसेंबर रोजी शास्त्रीय गायन व अभंगवाणी आयोजित करण्यात आली आहे. रात्री ८ ते १० वाजेपर्यंत शास्त्रीय गायन व अभंगवाणी होणार असून गायक पं. उमेश चौधरी व आसाम येथील गायिका श्रुती बुजरबुरुहा यांचे गायन सादरीकरण होणार आहे. त्यांना तबल्यावर किशोर पांडे, पखवाज सूरज गोंधळी, तालवाद्यावर गुरुदास कदम यांची साथ सांगत असणार आहे.

या कार्यक्रमाचे निवेदन रेवनाथ भाग्यवंत करणार आहेत. तत्पूर्वी सायंकाळी ४ वाजता हभप निवृत्ती महाराज यांचे प्रवचन तर सायंकाळी ५ वाजता सदगुरु वामनबाबा हरिपाठ मंडळ करवले यांचे हरिपाठ तसेच सायंकाळी ०६ वाजता हभप ज्ञानेश्वर महाराज बोगीर (नाशिक) यांचे कीर्तन होणार आहे. त्यांना मृदुंगावर मधुकर धोंगडे व अविनाश पाटील यांची साथ असणार आहे.

# विज्ञान स्पर्धेत रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालय तृतीय

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाती अकरावी विज्ञान शाखेत शिकत असलेल्या सार्थक किर्तीकुमार महाडिक यास विज्ञान प्रदर्शनात सुयश मिळाले.

सानपाडा कॉलेज ऑफ कॉमर्स अ‍ॅन्ड टेक्नोलॉजी येथे ७ डिसेंबर २०२४ या दिवशी अंतर कॉलेज विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यात सार्थक किर्तीकुमार महाडिक यास तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषक मिळाले आहे. त्याने Attendeasy नावाचे app बनविले होते. ज्याचा फायदा भविष्यात attendence घेण्यासाठी शिक्षकांना नक्कीच होईल. त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्याच्या या यशाबद्दल प्राचार्या निशा नायर यांनी त्याचे कौतुक केले.

या यशाबद्दल संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, बोर्ड ऑफ डायरेक्टर संजय भगत, सचिव डॉ. एस.टी. गडदे, स्कूल कमिटी मेंबर प्रभाकर जोशी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.



# महाविद्यालयीन मुलींसाठी डिफेन्स ट्रेनिंग

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वुमेन डेव्हलपमेंट सेल व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने मंगळवारी (दि.१०) मुलींसाठी डिफेन्स ट्रेनिंगचे आयोजन करण्यात आले होते.



या ट्रेनिंगसाठी प्रवीण पंढरीनाथ पाटील फाउंडर मार्शल आर्ट्स फेडरेशन यांनी उपस्थित राहून विद्यार्थिनींना डिफेन्सचे प्रशिक्षण दिले व वेगवेगळे कसरती करून दाखवल्या. या डिफेन्स प्रशिक्षणामध्ये सुमारे १५० विद्यार्थिनींनी सहभाग घेऊन प्रशिक्षण घेतले व कसरती करून दाखवल्या तसेच या डिफेन्स ट्रेनिंगचा फायदा त्यांना स्वरक्षणासाठी होणार आहे.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी डिफेन्स ट्रेनिंगसाठी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले व प्रशिक्षण घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. या डिफेन्स प्रशिक्षणचे आयोजन प्रा. सोनी पांडे व प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी केले तसेच प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. शुभम शर्मा, प्रा. नीलम मोरे, प्रा. मनोज यादव, प्रा. राहुल कांबळे, प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. डॉ. पूजा लांजेकर, प्रा. शितल चव्हाण, प्रा. तनुजा सुमन व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# ओवळेच्या उपसरपंचपदी धीरज पाटील बिनविरोध

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओवळे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपचे धीरज अरुण पाटील यांची बिनविरोध निवड झाली. उपसरपंच निलेश गायकवाड यांनी पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेसाठी ही निवडणूक घेण्यात आली होती.



या वेळी बोलताना नवे उपसरपंच धीरज पाटील यांनी, गावात सरपंच रूपेश गायकवाड यांच्या नेतृत्वात विकासकामे जोरात सुरु आहेत. त्यांचे हात बळकट करण्यासाठी आमची कार्यकारिणी प्रयत्नशील राहणार आहोत. ग्रामपंचायतीची सर्व कार्यकारिणी एकमेकांना सहकार्य करणारी असल्याने विकासात कोणताही अडथळा येत नाही, असे सांगितले, तर गावाला पुनर्वसन आवश्यक आहे, पण ग्रामस्थांच्या मागण्या योग्यरीत्या पूर्ण झाल्याशिवाय वीट हलू देणार नाही, असेही ते म्हणाले.

भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष राकेश गायकवाड यांनी, गावात वर्षभरात साडेतीन कोटींची कामे झाल्याचे सांगत रूपेश गायकवाड यांच्या कार्यकाळात विकासकामांची गंगा आणली जाणार असून आमदार महेश बालदी यांच्या प्रयत्नातून गाव विकसित होणार आहे, असे सांगत विकासकामांची यादी वाचली. या वेळी सर्व ग्रामपंचायत सदस्य आणि ग्रामस्थांनी नवनिर्वाचित उपसरपंचांना शुभेच्छा दिल्या.

# मातीच्या भांड्यांना मागणी ; कुंभार व्यवसायाला चालना

**उरण : वार्ताहर**

उरण तालुक्यातील चिरनेर गाव हे मूर्ती कलेबरोबर मातीच्या भांड्यांसाठीही प्रसिद्ध आहे. येथे कुंभार समाजाची लोकवस्ती असल्याने या समाजाचा पूर्वपरंपरागत मूळ मुख्य व्यवसाय मूर्तीकला आणि मातीची भांडी तयार करण्याचा असल्यामुळे चिरनेर कुंभारपाडा हे मूर्तीकला आणि मातीची भांडी यासाठी प्रसिद्ध आहे.



दरम्यान, गेल्या काही वर्षापूर्वी लोकांनी संसार उपयोगी मातीची भांडी वापरण्याकडे पाठ फिरवली होती. त्यामुळे मातीची भांडी वापरण्याचे प्रमाणही कमी झाले होते, परंतु अलीकडे वाढते प्रदूषण आणि प्लास्टिकच्या वस्तूंचा अतिरिक्त वापर यामुळे मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचा अनुभव लोकांना येऊ लागल्याने, पुन्हा एकदा अन्न शिजवण्यासाठी मातीच्या भांड्यांचा वापर होताना दिसू लागला आहे. अनेक लोक मातीच्या भांड्यामध्ये स्वयंपाक करणे पसंत करीत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातूनही मोठ्या प्रमाणावर मातीच्या भांड्यांना मागणी वाढली आहे. त्यामुळे मातीची भांडी बनविणाऱ्या कुंभारकाम व्यवसाय कारागिरांना सुगीचे दिवस आले आहेत. परिणामी मातीच्या भांड्यात अन्नाची चव आणि पोषणतत्वे टिकून राहत आहेत. त्यातून अन्नाची चव पौष्टिकता आणि सुगंध अधिक वाढतो. त्यामुळे सध्या बहुतांशी लोक मातीच्या भांड्यांमध्ये स्वयंपाक करणे पसंत करत आहेत. या मातीच्या भांड्यांना खूप मागणी आहे त्यामुळे येथील कुंभार कारागिरांचा व्यवसायदेखील चांगला वाढत आहे. मातीची भांडी आणि कुंभारकाम व्यवसायाला सुगीचे दिवस आले आहेत.

विशेष म्हणजे मातीच्या भांड्यात अन्नाची चव व पोषक तत्वे टिकून राहत असून, अन्नाची चव, पौष्टिकता व सुगंध अधिक वाढतो. त्यामुळे सध्या ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातील नागरिकदेखील मातीच्या भांड्यांमध्ये स्वयंपाक करणे पसंत करीत आहेत. मातीच्या भांड्यामध्ये अन्न शिजवताना अन्नामध्ये असलेली पोषक तत्वे योग्य प्रमाणात राहतात. ती नष्ट होत नाहीत. त्यामुळे अन्नाची चव वाढते.

**जागेअभावी व्यवसायात अडचण**

मातीची मातीच्या भांड्यांना वाढती मागणी असल्यामुळे आमच्या कुंभार व्यवसायला व कारागिरांना रोजगार उपलब्ध होत आहे. ग्रामीण भागाबरोबर शहरी भागातील अर्थात नवीमुंबई, मुंबई येथील ग्राहक दरवर्षी कुंभार वाड्यात आवर्जून येऊन खापरी, तई, चुली, भीण, जोगळी, मडकी, लग्नातील नक्षीदार आयरी चांगल्या दराने खरेदी करतात, परंतु मातीच्या भांड्यांच्या व्यवसायाला जागेचा अभाव असल्यामुळे या धंद्यात मोठी अडचण निर्माण होत आहे, असे कुंभार समाजाचे कारागीर दामोदर चौलकर, भाई चौलकर, गीता चौलकर या सर्वांनी सांगितले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ग्रंथालय दिवस

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय समितीच्या वतीने ग्रंथालय दिवस साजरा करण्यात आला.

भारतात ग्रंथपालनशास्त्राची मुहूर्तमेढ रोवणारे डॉ. एस. आर. रंगनाथन यांचा जन्मदिन त्यांच्या स्मरणार्थ हा दिवस ग्रंथालय दिन म्हणून साजरा केला जातो.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांनी डॉ. एस. आर. रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले व त्यांच्या विषयी विचार मांडले. महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी डॉ. एस आर रंगनाथन यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण केले व अभिवादन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन प्रा. डॉ. पूजा लांजेकर यांनी केले तसेच वैभव झगडे तसेच समितीतील इतर सर्व सदस्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



## संपादकीय

# ईव्हीएमविरोध उथळ

विधानसभा निवडणुकांचे मतदान ईव्हीएमवर होणार हे विरोधकांच्या महाविकास आघाडीला निवडणुकीपूर्वी ठाऊक होते. मग त्यांनी निवडणुकांआधीच ईव्हीएमवर अविश्वास का जाहीर केला नाही? ईव्हीएमवरील निवडणुकांत सहभागी होणार नाही अशी भूमिका त्यांनी आधीच घ्यायला हवी होती. पराभवानंतर विरोधकांनी ईव्हीएमविरोधात सुरू केलेली ओरड म्हणूनच हास्यास्पद वाटते.

**विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्ष आणि महायुतीला जनतेने भरभरून यश दिले. विरोधकांच्या महाविकास आघाडीला मात्र पराभवाचा धक्का बसला आणि विरोधक अद्यापही या धक्क्यातून सावरायला तयार दिसत नाहीत. निकालानंतर विरोधकांनी वेगवेगळी आकडेवारी समोर आणत संपूर्ण राज्याच्या निकालाचा पॅटर्न एकसारखा असल्याचा आरोप केला. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीचा हवाला देऊनही आक्षेप घेण्यात आले. आयोगाने अधिकृतपणे हे आक्षेप फेटाळले आहेत. दर निवडणुकीनंतर पराभूत विरोधकांकडून ईव्हीएम यंत्रांच्या विश्वासार्हतेबाबत शंका उपस्थित केल्या जाणे आणि निवडणूक आयोगाने त्यावर खुलासे करणे हे नित्याचे झाले आहे. सर्वोच्च न्यायालयानेही संबंधित याचिका फेटाळून लावताना याच विरोधाभासावर बोट ठेवले. जेव्हा तुमचा विजय होतो, तेव्हा ईव्हीएममध्ये गडबड नसते. हरले की मतदान यंत्रामुळे हरलो असे सांगता, असे म्हणत सर्वोच्च न्यायालयानेही विरोधकांना खडे बोल सुनावले, पण तरीही ईव्हीएमच्या विरोधात नाट्यमय निषेध नोंदवणे सुरूच आहे. पराभव हा आपले कुठे चुकले, आपण कुठे कमी पडलो याचा विचार करायला भाग पाडतो, पण राज्यातील विरोधक मात्र त्या दिशेने विचार करताना दिसत नाहीत. निवडणुकीपूर्वी आपल्या आघाडीत समन्वय होता का, आपण प्रचारात कुठे कमी पडलो, आपले प्रचाराचे मुद्दे योग्य होते का, आपल्या जाहीरनाम्यात काय चुका झाल्या असाव्यात, पक्षसंघटनांचे काम प्रभावी ठरले का, नियोजनात काय चुका झाल्या, बूथव्यवस्थापन चुकले का यांसारख्या प्रश्नांची उत्तरे महाविकास आघाडीच्या नेत्यांनी शोधणे गरजेचे आहे, परंतु त्याऐवजी ही मंडळी मतदान यंत्रालाच दोष देत आहेत. महायुतीचा राज्यात जोरदार विजय झाला, पण जनता त्याबद्दल जल्लोष करताना दिसली नाही हा दावा तर हास्यास्पदच म्हणायला हवा. या दाव्याच्या आधारे विजयाचा खरेखोटेपणा कसा सिद्ध करता येईल? विधानसभा निवडणुकीत भाजप व महायुतीला मिळालेला विजय विक्रमी व ऐतिहासिक आहे. तर विरोधकांच्या महाविकास आघाडीचे संख्याबळ कमालीचे खाली घसरले आहे. अशावेळी अधिवेशनाच्या काळात त्यांनी विचारपूर्वक वागण्यातच त्यांची प्रगल्भता दिसली असती. असे असताना आघाडीकडून शपथविधीवर एका दिवसापुरता बहिष्कार टाकणे व दुसऱ्या दिवशी जाऊन शपथ घेणे यांसारखे बालिश प्रकार घडले. लोकसभा निवडणुकीतील अल्पशा यशाने विरोधक हुरळून गेले होते. त्यामुळेच त्यानंतरच्या विधानसभा निवडणुकीतील मोठा पराभव पचवणे त्यांना चांगलेच जड जाते आहे हे उघड आहे. विरोधक आता कागदी मतपत्रिकेचा आग्रह धरत आहेत. मतदान केंद्रे ताब्यात घेऊन कागदी मतपत्रिकांवर आपल्या उमेदवाराच्या नावावर शिक्के मारण्याचे प्रकार ईव्हीएमपूर्व काळात सर्रास घडले आहेत हे विरोधकांच्या आघाडीला चांगलेच ठाऊक आहे. निवडणूक आयोगाने ईव्हीएम हॅक करता येत नाही हे यापूर्वीही अनेकदा सांगितले आहे. या यंत्रामध्ये फेरफार घडवून दाखवण्याचे खुले आव्हानही आयोगाने दिले आहे आणि आजवर कुणालाही हे आव्हान स्वीकारता आलेले नाही. लोकशाही प्रक्रियेद्वारे मतदारांनी दिलेला कौल स्वीकारण्यास स्वत:ला लोकशाहीवादी म्हणवणारे हे विरोधक तयार नाहीत याला काय म्हणावे?**

# भारतीय बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद

विश्वनाथन आनंद हा भारतीय बुद्धिबळपटू, आंतरराष्ट्रीय ग्रँडमास्टर आणि माजी विश्वविजेता आहे. विश्वनाथन आनंद यांचा जन्म ११ डिसेंबर १९६९ रोजी झाला. विश्वनाथन आनंद हा भारतीय बुद्धिबळपटू आणि माजी बुद्धिबळ विजेता आहे. आनंदने पाच वेळा जागतिक बुद्धिबळ स्पर्धा जिंकली असून तो निर्विवाद विजेता ठरला आहे. विश्वनाथन आनंद २००३ FIDE वर्ल्ड चेस चॅम्पियनशिपमध्ये जागतिक बुद्धिबळ बनला आणि त्यांच्या काळातील ड्रीड खेळाडू मानला जातो.

१९८८मध्ये विश्वनाथन आनंद भारताचा ग्रँडमास्टर झाला. भारतातील सर्वात सन्माननीय क्रीडा पुरस्कार (१९९१–९२) हा राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार प्राप्त करणारे ते पहिले होते. २००७मध्ये विश्वनाथन आनंद यांना पद्मविभूषण, भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला, ज्यामुळे हा पुरस्कार प्राप्त करणारे ते भारतीय इतिहासातील पहिले खेळाडू ठरले. आनंदने सहा वेळा (१९९७, १९९८, २००३, २००७, २००८) बुद्धिबळ ऑस्कर जिंकला आहे.

विश्वनाथन आनंदला भारतीय बुद्धिबळाचा बादशहा म्हटले तर अतिशयोक्ती होणार नाही. सन २०००मध्ये तो केवळ भारताचाच नव्हे तर आशियातील पहिला बुद्धिबळ विश्वविजेता ठरला. १८८६मध्ये विजेते ठरलेल्या विल्हेल्म स्टेन्झ या पहिल्या विश्वविजेत्याचे विचार केल्यास, आनंद हा १५वा विश्वविजेता ठरला. २४ डिसेंबर २००० रोजी तेहरान येथे झालेल्या चॅम्पियनशिपमध्ये त्याने सहा खेळांच्या चौथ्या सामन्यात रशियन वंशाचा स्पॅनिश प्रतिस्पर्धी अलेक्सई शिरोवचा पराभव करून जागतिक विजेतेपद पटकावले. अशा नेत्रदीपक विजयाची पुनरावृत्ती विश्वविजेतेपदाच्या सामन्यात होणे कदाचित कठीण आहे. हा सामना जिंकल्यावर आनंदला ६,६०,००० डॉलरचे बक्षीस मिळाले.



२००२मध्ये विश्वनाथन आनंदने जागतिक स्तरावर चौथे यश मिळवून पुन्हा एकदा नवा इतिहास रचला. फ्रान्समध्ये सुरू असलेल्या कोर्सिका खुल्या बुद्धिबळ स्पर्धेतील पहिल्या गेममध्ये पराभव पत्करावा लागल्यानंतर आनंदने रशियाच्या अनोतोली कार्पोसचा पराभव करत अंतिम सहाव्या गेममध्ये विजय मिळवला. जागतिक चॅम्पियनशिपची विभागणी होत असताना, त्यांनी २००० ते २००२पर्यंत FIDE वर्ल्ड चेस चॅम्पियनशिपचे विजेतेपद पटकावले. तो २००७मध्ये निर्विवाद जागतिक चॅम्पियन बनला आणि २००८मध्ये व्लाडामीर क्राम्निककडून त्याच्या विजेतेपदाचा बचाव केला, त्यानंतर त्याने २०१०मध्ये वेसेलिन तपोलाएव विरुद्ध त्याचे विश्व चॅम्पियनशिपचे विजेतेपद यशस्वीरित्या जिंकले आणि २०१२मध्ये पुन्हा जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिप जिंकली. जी बोरिस गल्फविरुद्ध होती. २०१३च्या जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिपमध्ये मागनुस कार्सलेनविरुद्ध त्याचा पराभव झाला होता.

विश्वनाथन आनंद हा इतिहासातील नऊ खेळाडूंपैकी एक आहे ज्यांनी FIDE जागतिक बुद्धिबळ चॅम्पियनशिप यादीत आपला जुना विक्रम मोडला आणि संपूर्ण २१ महिने जागतिक क्रमांक १चा खेळाडू राहिला. आणि ते आपल्या आयुष्यात सहा वेळा या ठिकाणी राहिला. १९८८मध्ये विश्वनाथन आनंद भारताचा पहिला ग्रँडमास्टर बनला. आणि १९९१–९२मध्ये तो राजीव गांधी खेल रत्न पुरस्कार प्राप्त करणारा पहिला खेळाडू बनला, जो क्रीडा जगतातील भारताचा सर्वात मोठा पुरस्कार आहे. २००७मध्ये त्यांना भारताचा दुसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार, पद्मभूषण देण्यात आला आणि हा पुरस्कार प्राप्त करणारे ते पहिले खेळाडू होते.

विश्वनाथन आनंदने ग्रँडमास्टर बनून भारताची गमावलेली प्रतिष्ठा परत मिळवली. त्यांचा जन्म दक्षिण भारतात १९६९मध्ये झाला. वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी ग्रँडमास्टरची पदवी संपादन केली. वयाच्या २७व्या वर्षी ते जगातील नंबर २ खेळाडू बनला. १९८८मध्ये त्याने हे विजेतेपद मिळवले. लियेनेर्स अंतर्राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेत आनंदला सातवे स्थान मिळाले. याच स्पर्धेत त्याने विश्वविजेता कारपोरोव आणि ब्रिटनच्या जनाथन स्पीलमैनचा पराभव केला.


मुंबईतील 'ए' राष्ट्रीय स्पर्धा जिंकून त्यांनी आपली प्रतिभा सिद्ध केली. या चॅम्पियनशिपमध्ये त्यांना वयाच्या १६व्या वर्षी FIDAद्वारे मान्यताप्राप्त १५ खेळाडूंपैकी FIDA रेटिंग मिळाले. विश्वनाथन आनंद यांनी वयाच्या पाचव्या वर्षी बुद्धिबळ खेळायला सुरुवात केली. पालकांकडून युक्त्या शिकल्या. १९८२मध्ये त्यांनी ज्युनियर चॅम्पियनशिपची राष्ट्रीय स्पर्धा जिंकली.

२०००मध्ये त्याने FIDE वर्ल्ड चेस चॅम्पियनशिप जिंकली. २००७च्या वर्ल्ड चॅम्पियनशिप जिंकल्यानंतर, ते बुद्धिबळाचा निर्विवाद राजा बनले. १४ ते २९ ऑक्टोबर २००८ दरम्यान झालेल्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत व्लादिमीर क्रॅमनिकचा पराभव करून त्यांनी आपले विजेतेपद कायम राखले. या विजयासह, ते नॉकआऊट, टूर्नामेंट आणि मॅच अशा तीन वेगवेगळ्या फॉरमॅटमध्ये चॅम्पियनशिप जिंकणारा जागतिक बुद्धिबळ इतिहासातील पहिला खेळाडू ठरला आहे. वाणिज्य शाखेतील पदवीधर, विश्वनाथन आनंदला अभ्यासाव्यतिरिक्त पोहणे आणि संगीताची खूप आवड आहे.

१९८८मध्ये भारताचे पहिले ग्रँडमास्टर बनले. २०००मध्ये FIDE वर्ल्ड चेस चॅम्पियनशिप जिंकणारे पहिले भारतीय बनले. सहा वेळा बुद्धिबळ ऑस्कर जिंकला. २००७ आणि २००८मध्ये ते जागतिक बुद्धिबळ चॅम्पियन होते. विश्वनाथन आनंद आतापर्यंत पाच वेळा विश्व बुद्धिबळ चॅम्पियन बनले आहे. २००० साली प्रथमच विश्वविजेता बनलेले विश्वनाथन आनंद २००७पासून आजपर्यंत (२०१२) सलग चार वेळा विश्वविजेता आहे.

विश्वनाथन आनंद यांना भारत सरकारने क्रीडा क्षेत्रात अर्जुन पुरस्कार (१९८५), पद्मश्री (१९८७), पद्मभूषण (२०००), पद्मविभूषण (२००७), राजीव गांधी खेलरत्न (१९९१–१९९२) देऊन सन्मानित केले.

**(साभार : इंटरनेट)**



# मोक्षदा एकादशी म्हणून मानली जाते खास

हिंदू धर्मात व्रत आणि उपासनेला विशेष महत्त्व असून मार्गशीर्ष महिन्यातील एकादशीला अतिशय महत्त्व आहे. साधारण वर्षाला २४ एकादशी येतात, मात्र यंदा २०२३ मध्ये अधिक मास आल्यामुळे दोन एकादशी अधिक होत्या. मार्गशीर्ष महिन्यातील एकादशी ही पितदोषांपासून मुक्तीसाठी खास मानली जाते. पंचांगानुसार मार्गशीर्ष महिन्यातील शुक्ल पक्षातील एकादशीला मोक्षदा एकादशी असं म्हटलं जातं. मोक्ष म्हणजे पितारांना मोक्ष मिळणे म्हणून या एकादशीला मोक्षदा एकादशी असं म्हणतात. त्याशिवाय या एकादशी व्रताने सुख, समृद्धी आणि लक्ष्मीचा आशिवार्द मिळतो.

**मोक्षदा एकादशीचं महत्त्व**

एकदाशीचं व्रत हे भगवान विष्णूला समर्पित आहे. प्रत्येक एकादशीचं आपलं वेगळेपणा आणि वैशिष्ट्य आहे. मोक्षदा एकादशी ही तिच्या नावातच प्रतिबिंबित करते. या एकादशीला पितरांना मोक्ष मिळवावं म्हणून पूजा विधी करता. त्यामुळे त्यांना मोक्ष प्राप्त होते. मोक्षदा एकादशीला गुरुवायूर एकादशी, भागवत एकादशी किंवा वैष्णव मोक्ष असंदेखील म्हणतात. केरळच्या गुरुवायूर मंदिरात मोक्षदा एकादशी मोठ्या थाटात साजरी करण्याची परंपरा आहे. या दिवशी मंदिराचे दरवाजे २४ तास खुले असतात आणि रात्रभर भगवान विष्णूची पूजा करण्यात येते.

**मोक्षदा एकादशी व्रताची पौराणिक कथा**

पद्मपुराणानुसार मोक्षदा एकादशीच्या दिवशी भगवान विष्णूची तुळशीमंजरी, अगरबत्ती इत्यादींनी पूजा केली जाते. ही एकादशी सर्वात मोठ्या पापांचाही नाश करते अशी मान्यता आहे. पौराणिक कथेनुसार, प्राचीन काळी वैखनस नावाच्या राजाने पर्वत मुनींच्या सांगण्यावरून या तिथीवर आपल्या पूर्वजांच्या उद्धारासाठी व्रत केलं होतं. त्यामुळे वैखनस राजाच्या पूर्वजांची नरकातून मुक्तता झाली होती, अशी आख्यायिका आहे. तेव्हापासून या तिथीवर मोक्षदा एकादशीचं व्रत केलं जातं. **(साभार : इंटरनेट)**




# व्हॉट्सअॅप युजर्सची मजा! आलं जबरदस्त फीचर

लोकप्रिय इन्स्टंट मेसेजिंग अॅप व्हॉट्सअॅप आपल्या युजर्ससाठी वेळोवेळी नवनवीन अपडेट्स आणत असतं. युजर्सच्या सोयीसाठी कंपनीने पुन्हा एकदा एक नवीन फीचर आणलं आहे.




व्हॉट्सअॅपच्या नवीन फीचरमुळे युजर्स यापुढे महत्त्वाचे मेसेज विसरणार नाहीत. व्हॉट्सअॅपने आपल्या जवळपास चार बिलियन युजर्ससाठी एक दमदार फीचर आणलं आहे. या फीचरचं नाव मेसेज रिमाइंडर्स असं आहे, जे महत्वाचे मेसेजबद्दल माहिती देईल.

व्हॉट्सअॅपचे मेसेज रिमाइंडर्स फीचर युजर्सना त्या मेसेजची आठवण करून देईल जे त्यांनी अजून वाचलेले नाहीत. यापूर्वी हे रिमाइंडर फीचर फक्त स्टेटस अपडेटसाठी उपलब्ध होतं. आता हे फीचर फक्त काही युजर्ससाठी आणलं गेलं आहे. परंतु टेस्टनंतर ते सर्व युजर्ससाठी आणलं जाईल.

W-Betainfo च्या लेटेस्ट रिपोर्टमधून खुलासा झाला आहे की, Google Play Store वर उपलब्ध लेटेस्ट व्हॉट्सअॅप beta for Android २.२४.२५.२९ update वर स्पॉट केला गेला आहे. अशा परिस्थितीत युजर्सना न वाचलेल्या मेसेजसाठी रिमाइंडरही मिळेल. W-Betainfoने या नवीन फीचरचा स्क्रीनशॉट देखील शेअर केला आहे.

मेसेज रिमाइंडरमध्ये, युजर्सना आता सेटिंग्जमध्ये रिमाइंडर टॉगल मिळेल. टॉगल इनेबल केल्यावर, तुम्हाला न वाचलेले मेसेज आणि व्हॉट्सअॅपच्या अनरिड मेसेजमध्ये मिळतील. हे टॉगल आधीही युजर्ससाठी उपलब्ध होतं. हे केवळ स्टेटस रिमाइंडरसाठी कार्य करतं. हे फीचर सुरू केल्यामुळे लोकांचे मेसेज मिस होणार नाहीत.

व्हॉट्सअॅप ही एक लोकप्रिय संदेशन प्रणाली (इन्स्टन्ट मॅसेजिंग) आहे. हिच्यामार्फत लोक इंटरनेट वापरून एकमेकांशी चर्चा करतात, संदेश पाठवतात व वाचतात. संदेशासोबत चित्रे, गाणी, व्हीडियो व इतर प्रकारच्या फाईल्सदेखील एकमेकांसोबत सामाईक करता येतात.

# कादंबरीकार पुरूषोत्तम यशवंत देशपांडे



**निमित्त**

मराठी कादंबरीकार, तत्त्वचिंतक व राजकीय कार्यकर्ते. जन्म अमरावती येथे. १९२५ साली ते मंबई विद्यापीठाचे एम्. ए. झाले आणि पुढे एल्एल. बी.ची पदवी त्यांनी नागपूर विद्यापीठातून १९२६ साली घेतली. १९२५मध्ये त्यांचे कोल्हटकर घराण्यातील विमलाबाईंशी लग्न झाले. १९३१ साली वऱ्हाडच्या 'यूथ लीग' चे ते अध्यक्ष होते. प्रांतिक काँग्रेस कमिटीचे ते चिटणीस होते (१९३४). गांधीजींच्या असहकाराच्या चळवळीत त्यांनी १९२१ साली भाग घेतला एक वर्ष कॉलेज सोडले. १९३२ च्या आंदोलनात त्यांना कारावास घडला. १९४२ च्या 'छोडो भारत' चळवळीत भाग घेतल्याबद्दलही त्यांना कारावास भोगावा लागला होता. मध्य प्रदेशाच्या इंटक शाखेचे ते अध्यक्ष होते.

भवितव्य नावाचे साप्तहिक त्यांनी १९४१ साली चालू केले. नागपूर येथे ते वकिलीचा व्यवसाय करीत. वैदिक वाङ्मय व विशेषतः बौद्ध साहित्य यांचे ते व्यासंगी अभ्यासक आहेत. विद्यालयीन कालात रामकृष्ण परमहंस, विवेकानंद व विशेषतः स्वामी रामतीर्थ यांच्या वाङ्मयाचा फार मोठा ठसा त्यांच्या विचारांवर उमटला. ते १९३३ ते १९४२ सालापर्यंत मार्क्सवादाच्या प्रभावाखाली होते. तथापि त्यांची निष्ठा गांधीवादावरच अधिकाधिक बसत गेली. गांधीजीच का ?(१९४४) ह्या ग्रंथात गांधीजींना लाभलेल्या माहात्म्याची मीमांसा त्यांनी केली आहे. आधुनिक विचारप्रणालीचा त्यांचा व्यासंग सखोल होता तथापि अंतर्मुख वृत्ती, चिंतनशीलता आणि ब्रह्मज्ञानाची आवड यांमुळे जीवनविषयक सखोल विचार करण्याची त्यांची प्रवृत्ती होती.

त्यांच्या साहित्यात बंधनाच्या पलीकडे (१९२८), सुकलेले फूल (१९३१), सदाफुली (१९३३), विशाल जीवन (१९३९), काळी राणी (१९४१), नवे जग (१९४१), आहुती (१९५९) व मेरी घोष की धर्मघोष ?(१९७२) या कादंबऱ्या नवी मूल्ये (१९४६) हा निबंधसंग्रह निर्माल्यमाला (१९३३) ह्या कविता आणि साहित्यअकादेमीचे १९६२ सालचे पारितोषिक मिळालेले अनामिकाची चिंतनिका हे तात्त्विक पुस्तक यांचा अंतर्भाव होतो. त्यांच्या कादंबऱ्यांत व्यक्ती आणि तिच्या अंतर्मनातील संघर्ष यांच्यावर भर आहे. फडके–खांडेकरांच्या कादंबरी–युगात वेगळी उठून दिसणारी अशी त्यांची कादंबरी आहे. तिच्यात अत्यंत प्रगल्भ व्यक्तिमनांचे तात्विक, वैचारिक, भावनिक स्वरूपाचे मूलभूत प्रश्न आधुनिक जीवनाच्या पार्श्वभूमीवर मोठ्या तरलपणाने व हळुवारपणाने चित्रित करण्याचा प्रयत्न आहे. एक प्रकारची बंडखोर पण चिंतनशील स्वच्छंदतावादी वृत्ती त्यांच्या सर्व कादंबऱ्यांमागे जाणवते. काही तांत्रिक प्रयोगही देशपांड्यांनी केले आहेत. सुकलेले फूल व सदाफुली या त्यांच्या कादंबऱ्या विशेष महत्त्वाच्या मानल्या जातात.

ह्यांखेरीज भारतीय संस्कृतीला आव्हान व सोव्हिएट रशिया आणि हिंदुस्थान (१९४४) हे त्यांचे ग्रंथही उल्लेखनीय आहेत. ह्यांपैकी दुसऱ्या ग्रंथात 'सोव्हिएट रशियाची विपरीत करणी, मार्क्सवादाचे देहावसान' आदी विषय विवेचिले आहेत. अनुभवामृत रसरहस्य (३ खंड, १९६२–६५) हे त्यांनी ज्ञानदेवांच्या अनुभवामृतावर केलेले एक नवे निरूपण. ज्ञानदेवांचे एक चरित्रही त्यांनी इंग्रजीत लिहिले आहे. पतंजलीच्या योगसूत्रांवर एक अभिनव भाष्य करण्याच्या उद्देशाने लिहिलेले द ऑथेंटिक योग हे त्यांचे पुस्तक इंग्लंडमध्ये प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्याचा जर्मन अनुवाद १९७६ साली जर्मनीत प्रसिद्ध झाला.

पॅरिस येथे १९५२ साली 'इंटरनॅशनल कॉन्फरन्स फॉर कल्चरल फ्रीडम'च्या बैठकीला ते भारतीय संस्कृतिमंडळाचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. ताश्कंद येथील आफ्रो–आशियाई लेखक–परिषदेला एक भारतीय प्रतिनिधी ह्या नात्याने ते उपस्थित होते. रशिया, स्वित्झर्लंड, इटली, इंग्लंड इ. देशांचा प्रवासही त्यांना घडला आहे. विदर्भ साहित्य संघ व इतरही वाङ्मयीन संस्थांचे अध्यक्षपद त्यांना लाभले होते.

**(साभार : विश्वकोष मराठी)**

**क्लिक...क्लिक...!**



**श्रीवर्धन : खराब हवामानामुळे मच्छिमार बांधवांनी त्यांच्या बोटी किनाऱ्यावर नांगरून ठेवल्या आहेत.** (छाया : भरत चोगले)

## आरोग्य प्रहर

# दररोज मशरूम खाल्ल्याने शरीराला होतात फायदे

मशरुम खाणे आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. मशरुममध्ये अत्यंत कमी कॅलरी असतात. सोबतच त्यात अनेक पोषणतत्व असतात. मशरुममध्ये मोठ्या प्रमाणात अँटीऑक्सिडंट असते. मशरुममध्ये विटामिन डीदेखील असते. हे विटामिन हाडांच्या मजबुतीसाठी आवश्यक असतं.



मशरुम खाल्ल्याने २० टक्के विटामिन डीची कमतरता भरून निघते. अशातच नवीन संशोधनानुसार, दिवसातून फक्त पाच लहान मशरुम खाल्ल्याने हृदयविकार, कर्करोग आणि स्मृतिभ्रंश यांसह अनेक रोगांचा सामना करण्यास मदत होऊ शकते.

जगभरात १४ हजार वेगवेगळ्या जातींचे मशरुम आहेत, मात्र आपण ते सगळेच खाऊ शकत नाही, कारण त्यातले काही मशरुम हे विषारीही आहेत. मशरूम फाउंडेशन ऑफ इंडियाच्या मते, मशरुममध्ये प्रथिने, कार्बोहायड्रेट आणि जीवनसत्त्वे भरपूर असतात, कॅलरी मूल्य कमी असते आणि म्हणूनच हृदय आणि मधुमेहाच्या रुग्णांसाठी शिफारस केली जाते. तृणधान्ये, फळे आणि भाज्यांच्या तुलनेत मशरुममध्ये जास्त प्रथिने असतात. मशरुम शिजवल्यानंतरही प्रथिने टिकून राहतात. मशरुममध्ये कमी उष्मांक, उच्च प्रथिने, उच्च फायबर सामग्री असल्याने ते मधुमेह आणि उच्च रक्तदाब रुग्णांसाठी फायदेशीर आहेत, असे संशोधकांचे म्हणणे आहे.

भारतात आठ सर्वात लोकप्रिय मशरुम आहेत, त्यातलाच एक लहान, बंद टोपी आणि हलके तपकिरी किंवा फिकट पांढऱ्या रंगाचा मशरुम जगभरात उगवलेला आणि वापरला जाणारा सर्वात लोकप्रिय मशरुम प्रकार आहे. यामध्ये जीवनसत्त्वे (बी जीवनसत्त्वे, व्हिटॅमिन डी), खनिजे (सेलेनियम, तांबे, पोटॅशियम) आणि अँटिऑक्सिडंट्स यांसारख्या आवश्यक पोषक तत्वांचा हा चांगला स्त्रोत आहे. शिताके मशरुम, कॉर्डीसेप्स मशरुम, लायन्स माने मशरुम, रेशी मशरुम, टर्की टेल मशरुम आणि चागा मशरुम या भारतात आढळणाऱ्या इतर जाती आहेत.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

# अलिबागेत सकल हिंदू समाजाचा मूक मोर्चा

## बांगलादेशातील अत्याचाराचा निषेध






**अलिबाग : प्रतिनिधी**

बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचाराच्या निषेधार्थ मंगळवारी अलिबाग येथे सकल हिंदु समाजातर्फे जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढला. या मोर्चात विविध हिंदुत्ववादी पक्ष आणि संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. याबाबत जिल्हाधिकारी याना निवेदन देत हे अत्याचार थांबवण्याबाबत केंद्र सरकारने कठोर पावले उचलावीत, बांग्लादेश सरकारला तसे निर्देश द्यावेत, अशी विनंती करण्यात आली आहे.

अलिबाग शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातून या मोर्चाला सुरूवात झाली. आंदोलकांनी हातात फलक धरत आपल्या भावना व्यक्त करून बांगलादेशातील हिंदुवरील अत्याचार थांबवावेत अशी मागणी केली. बांगलादेशात कटटरपंथीय मुस्लिमांकडून हिंदुंची मंदिरे, घरेदारे दुकाने जाळली जात आहेत.तेथील हिंदु महिलांवरदेखील अमानवीय अत्याचार होत आहेत. आंतरराष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने याची गंभीर दखल घ्यावी व तेथील मुंडा, चकमा, कुकी, बौदध आदिवासी , दलित हिंदु बांधवांना अत्याचारापासून मुक्ती द्यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

बांगलादेशमधील सरकारदेखील हिंदु व अन्य अल्पसंख्यांक यांच्यावरील अत्याचारास मुकसंमती देत असल्याचा आरोप या निवेदनातून करण्यात आला. स्वातंत्रयाच्या वेळी बांगलादेशमध्ये हिंदुंची संख्या ३३ टक्के होती ती आता ८ टक्के इतकीच राहिली आहे. आपल्या सरकारने वेळीच पावले उचलली नाही तर तेथील हिंदु इस्लामी कटटरवादाला बळी पडून नामशेष होण्याची भीती या निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे. तेथील हिंदुंच्या रक्षणासाठी आवश्यक ते सर्व उपाय अंमलात आणावेत आणि या जाचातून हिंदुंची मुक्तता करावी अशी विनंती सरकारला करण्यात आली आहे.

आमदार महेंद्र दळवी यांनी मोर्चाच्या सुरूवातीला उपस्थित राहून आंदोलनाला पाठिंबा दिला. शिवसेना शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख राजा केणी, भाजपचे जिल्हा सरचिटणीस अ‍ॅड. महेश मोहिते, माजी तालुका अध्यक्ष हेमंत दांडेकर, शेकापचे प्रशांत नाईक, विश्व हिंदु परीषदेचे चेतन पटेल, ऋषीकेश भातखंडे, रविकिरण काळे आदींसह विविध संघटनांचे प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते.

# मातीचे संगोपन आणि संवर्धन करणे आवश्यक –डॉ.रवींद्र मर्दाने

**कर्जत : प्रतिनिधी**

जैवविविधता टिकवून ठेवण्यात मातीचा मोलाचा वाटा असून अन्न, वस्त्र, निवारा, औषधी या जीवनाच्या चार प्रमुख साधनांचा स्त्रोतही माती असल्याने मातीचे संगोपन आणि संवर्धन करणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी कर्जत केले.

येथील प्रादेशिक कृषी संशोधन केंद्रात आयोजित १० व्या जागतिक मृदा दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी सहयोगी संशोधन संचालक डॉ. पुष्पा पाटील होत्या. डॉ. मर्दाने यांनी थायलँडचे राजे भूमीबोल अदुल्यादेज यांचा ५ डिसेंबर हा जन्मदिन 'जागतिक मृदा दिन' म्हणून साजरा करण्याचे संयुक्त राष्ट्र महासभेने २०१३ च्या ६८ व्या अधिवेशनात घोषित केल्याने सन २०१४ मध्ये पहिल्यांदा साजरा झाल्याचे सांगितले.७० वर्षे १२६ दिवसांची सम्राटाची कारकीर्द गाजवलेल्या भूमीबोल यांच्या कार्याचे व या दिनाच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीचे त्यांनी विवेचन केले.'


'मातीची काळजी मापन निरीक्षण व व्यवस्थापन' हे यावर्षीच्या उत्सवाचे घोषवाक्य असल्याचे सांगुन ते म्हणाले की, भारताच्या ३२८.७३ दशलक्ष हेक्टर जमिनीच्या क्षेत्रफळापैकी १२०.४० दशलक्ष हेक्टर जमीन नापीक होत आहे.पाणी व वाऱ्यामुळे दरवर्षी देशातील ५.३ अब्ज टन सुपीक मातीची धूप होऊन ती नष्ट होत चालली आहे.महाराष्ट्राच्या ३.०७ दशलक्ष हेक्टर भौगोलिक क्षेत्रफळापैकी ४२.५० टक्के जमीन खराब आहे.१५९ लाख हेक्टर जमीन दुष्काळाच्या छायेत आहे. १४६ लाख हेक्टर क्षेत्रफळावर माती आणि पाणी संवर्धनाची नितांत गरज आहे. पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी राब भाजणी ऐवजी पर्यायी गादी वाफे पध्दतीचा अवलंब करण्यास शेतकऱ्यांना उद्युक्त करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला डॉ.पुष्पा पाटील व उपस्थितांनी भूमीबोल अदुल्यादेज यांच्या प्रतिमेचे पूजन करून विनम्र अभिवादन केले. जीव रसायन शास्त्रज्ञ डॉ. तुषार बेडसे यांनी आभार मानले.यावेळी डॉ.महेंद्र गवई, डॉ. मीनाक्षी केळुसकर, डॉ. वैशाली सावंत, डॉ.राजू सावळे, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# डंपिंगच्या आगीमुळे माणगावकरांचे आरोग्य धोक्यात

**माणगाव : बातमीदार**



माणगाव नगरपंचायतद्वारे शहरातील ओला सुका कचरा संकलन करुन तो उतेखोल येथील आश्रमशाळेलगत मोकळ्या जागेत डंपिंग केला जात आहे. डंपिंग केलेला प्लास्टिक व अन्य उपद्रवी घटकयुक्त कचर्याला रात्री भीषण आग लागत आहे. हजारो टन कचरा जळत असल्याने माणगावच्या हवेतील प्रदूषणात मोठी गंभीर वाढ झाली आहे. त्यामुळे माणगावकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे ही आग मुद्दाम लावली जात असल्याची शंका नागारिक व्यक्त करीत आहेत

माणगाव शहरातील जवळपास सर्वच प्रभागात गेले काही दिवस एक प्रकारे धुक्यासारखे दिसणारे धुरके हवेत पसरते आणि श्वासातुन ते थेट नागरिकांचे फुफ्फुसात जाऊन श्वास कोंडतो, प्लास्टिक जळल्याचा उग्रवास येऊन अस्वस्थ वाटते, जीव गुदमरतो. या परिसरातील लहान मुलांसह अनेकांना सर्दी खोकला, डोळे झोंबणे, मळमळ अशा प्रकारची लक्षणे प्रकर्षाने जाणवत आहे. खराब हवामानात कधी उष्णता, कधी थंडी मधेच पाऊस या बदलांमुळे आजारपण येत असल्याचा समज होऊन, लोक वैद्यकीय औषधोपचार करुन मुकाट्याने हे सहन करतात.

विशेष म्हणजे रात्रीच्या वेळेस वातावरणात थंडी असताना शहरातील नागरिक निद्रावस्थेत असतानाच थेट श्वासावाटे नकळत हा धुर फुफ्फुसात जातो त्याचा आरोग्यावर घातक परिणाम होण्याची दाट शक्यता व्यक्त होत आहे. खरे तर अशा प्रकारची आग ही सार्वजनिक आरोग्यास जीवघेणी आहे. प्लास्टिकच्या विषारी धुरामुळे भविष्यात माणगावात नागरिकांना फुफुसाच्या कॅन्सर सारख्या गंभीर आजारांना आमंत्रण आहे.

माणगाव नगरपंचायतीद्वारे शहर स्वच्छतेच्या दृष्टिकोनातून अनेक उपक्रम व उपाय योजनांचा एकिकडे मोठा गाजावाजा होतानाचे चित्र असुन घंटागाड्या, प्लास्टिक पिशव्या बंदी, गणेशोत्सवात निर्माल्य गोळा करुन कचरा संकलन, सर्वेक्षण केले जाते. जनजागृतीपर मोहिमा राबवण्यावर मोठा निधी खर्च होतो.

तर दुसरीकडे माणगाव शहरातील विकास कामे, वसाहती बांधकाम, रस्ते रुंदीकरणात येथे बेसुमार वृक्षतोडीने शहर बकाल झाले असून हवा प्रदूषण भीषण आहे. योग्य सांडपाणी निचरा व्यवस्था नसल्याने नदीचे प्रदूषण वाढले आहे. यातच शहरातील मुळ विषय कचरा डंपिंग आणि त्याची विल्हेवाट लावणे यासाठी घनकचरा, ओला-सुका कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारणीचे काम कुर्मगतीने व निष्काळजीपणे दुर्लक्षित झाल्याचेच चित्र निर्माण झाले आहे. अशातच शासनाकडून प्लास्टिक कचरा क्रशिंगसाठी माणगाव नगरपंचायतीला आलेल्या दोन नवीन मशिन तसेच घंटा गाड्या, टँकर, ट्रॅक्टर भंगार होऊन धुळ खात पडले आहेत. खरतर शहराचा विकास व सुंदर माणगांव, स्वच्छ माणगावकडे एक प्रकारे दुर्लक्ष होत आहे.

माणगावमधील लोकप्रतिनिधी विकासकामे करतात, मात्र या हवा प्रदूषणासारख्या अत्यंत संवेदनशील विषयावरही लक्ष देणे गरजेचे आहे. शहरातील इनलेट-आऊटलेट विरहित गटार बांधकामे, गणपती विसर्जन घाट, कालव्यावरील घाट बांधुन विकासकामे करण्यात धन्यता मानली जात आहे.

ही कामे जास्त महत्त्वपूर्ण नसुन प्राथमिकतेने पाणी व हवा प्रदूषण रोखणे सोबतच उत्तम आरोग्यसेवा व स्वच्छता विषयक पायाभूत विकासकामांना प्राधान्य देणे महत्त्वाचे आणि दूरगामी जनहितार्थ आहे. तसेच एकीकडे सार्वजनिक ठिकाणी कचरा जाळण्यास कायद्याने बंदी असतानादेखील उघडड्यावरच जाळलेल्या प्लास्टिक कचऱ्यामुळे रहिवासी क्षेत्रातील सूक्ष्म धूलिकणांचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढल्याचे माणगाव शहरात चित्र दिसून येत आहे.

**डंपिंगची आग ही समस्या गंभीर असून ती सोडविण्याचा आपला प्रामाणिक प्रयत्न आहे, तातडीने कचरा डंपिंगची आग विझविण्यात येईल व येथुन हे कचरा डंपिंग करणेच बंद करुन कचऱ्यावर योग्य प्रक्रिया करुनच त्याची योग्य विल्हेवाट लावणे हाच एकमेव उपाय दिसत असुन समस्येचे निराकरण करणे शक्य होईल.**

**–संतोष माळी, मुख्याधिकारी**
**नगरपंचायत माणगाव**

## माणगावात मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर

**माणगाव** : माणगावात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व तालुक्यातील प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवार ( दि.११) रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत मोफत नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजीत करण्यात आले आहे

या शिबिरात मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी येणाऱ्या रुग्णांनी येताना सोबत आधार कार्ड व रेशन कार्ड याची झेरॉक्स प्रत आणावी. तसेच मधुमेहाची व रक्तदाबाची औषधे सुरु असल्यास ती देखील घेऊन यावीत. रुग्णाला शस्त्रक्रियेसाठी जाण्याची,राहण्याची,जेवणाची व परत आणून सोडण्याची मोफत सोय करण्यात आली आहे. सदर शिबीर एचडीएफसी बँकेच्या समोर, मुंबई-गोवा महामार्गालगत पेपर विक्रे ते नितीन मेथा यांच्या जवळील महेंद्र मेथा यांचा सभागृह जुने एसटी स्टँड माणगाव याठिकाणी करण्यात आले आहे. तरी सदर शिबिराचा लाभ समाजातील सर्व गरीब गरजू रुग्णांनी घ्यावा असे आवाहन उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.

सदर शिबिरात सहभागी होणाऱ्या नेत्ररुग्णांनी नावनोंदणीकरिता विधिता मनीष मेथा मो. नं.८६९८७४०६४०,सुप्रिया संतोष शिंदे मो.नं.९०४९६६५५९८ यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.


# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दुरध्वनी कार्यालय : ०२२-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं. : ०२२-२७४५२२३३
उपायुक्त कार्यालय : ०२२- २७४५५७५१ आयुक्त कार्यालय : ०२२- २७४५२३३९
ई-मेल : panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

### अंदाजपत्र बनविणेकामी

| अनु.क्र. | निविदा क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १. | निविदा/पमपा/मातंवि २८२४/प्र.क्र.०३/५६८ /२०२४-२५ | पनवेल महानगरपालिकेत बायोमेट्रीक मशीन्स खरेदी करणेबाबत (१ वर्ष वॉरंटी व ४ वर्ष देखभाल दूरुस्ती सह असे एकूण १+४-५ वर्षांकरीता) अंदाजपत्र तयार करणेकरिता बाजारभाव मागवित आहेत. |
| २. | **SPECIFICATIONS:**<br>* Face Capacity: 6,000,<br>* Log Capacity: 1,00,000,<br>* Screen Resolution: 800*480.<br>* Display: 5.<br>* Identify mode: Face.<br>* Recognition Distance: Upto 5 feet.<br>* Recognition Speed: Upto 1 Sec.<br>* Power Source: Battery.<br>Power Backup: Upto 10 Hours.<br>Metal Enclosure with Digital Lock.<br>Ingress Protection: IP 65.<br>Communication: TCP/IP, WiFi, GSM² based.<br>Digital ID verification option using UIDAI's OKYC services.<br>(Aprox 50 biometric machines.) | |

या निविदेबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. ११/१२/२०२४ ते दि. १९/१२/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत माहिती व तंत्रज्ञान विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**सही/-**
**अतिरिक्त आयुक्त,I**
**पनवेल महानगरपालिका**

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२४/प्र.क्र. ५९९/६०२/२०२४**
**दिनांक :- १०/१२/२०२४**


# बामणगाव येथील शालेय विद्यार्थिनींना मोफत स्वसंरक्षण प्रशिक्षण

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

उसर येथील गेल इंडिया लिमिटेड, यांच्या वतीने आयोजित को.ए.सो. रामभाऊ मोरेश्वर पाटील हायस्कूल, बामणगाव येथील मुलींसाठी पाच दिवसीय मोफत स्वसंरक्षण स्वयंसिद्धा प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते.

अजित कुरेकर डीजीएम फायर अँड सेफ्टी यांनी मुलींबरोबर संवाद साधत स्वतःचा बचाव आणि इतरांचे रक्षण करण्याकरिता दिलेल्या प्रशिक्षणाचा नियमित सराव करणे कसे गरजेचे आहे याविषयी मार्गदर्शन केले. प्रभारी मुख्याध्यापिका उर्मिला घरत यांनी गेल इंडिया लिमिटेड उसरचे आभार मानीत स्वसंरक्षण प्रशिक्षणाचे महत्त्व मुलींना सांगितले.

प्रशिक्षण अनुप गुप्ता मुख्य महाप्रबंधक पीडीएचपीपी प्रोजेक्ट गेल उसर व जितिन सक्सेना, महाप्रबंधक, शितल लाकरा मुख्य प्रबंधक यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

या वेळी या कार्यक्रमास अजित कुरेकर, डीजीएम फायर अँड सेफ्टी, गेल इंडिया लिमिटेड उसर, सुलोचना पाटील मानव संसाधन ऑफिसर गेल इंडिया नंदकुमार गोंधळी, अध्यक्षा प्रिझम सामाजिक विकास संस्था, सुरेखा झोपे यांनी पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O & M ) /DIVN/MHD/ Tech/E-Tender-42/2024-25 Dtd.11.12.2024. No. 7000034508 | **Sub. :-** Invitation SRM E-tender for Supply & Erection of 300 AH, 24 Cells, 48V DC lead acid battery set at 220 KV Mahad Substation under EHV (O&M) Division Mahad.. | Rs.3,11,449/- (Including GST)+ 1% Labour CESS) |

EMD will be the 1% of the estimated cost or Rs.5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST.

Bid submission is from 11.12.2024 @ 00:00 hrs to 17.12.2024 @23:59Hrs for above tender for further details visit our website:- https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**



# महाराष्ट्र शासन

**कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल**
**पिनकोड-४१०२०६**
E-mail- panvel.ee@mahapwd.gov.in
दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४५२७७८ फॅक्स - ०२२-२७४६७४४०

**ई-कार्यप्रणाली अंतर्गत ई-निविदा क्र. ७७ (ई-निविदा)**
**सन २०२३-२४** ( फेर निविदा क्र.१)

सार्वजनिक बांधकाम (सा.बां.) विभाग, पनवेल हे (दुरध्वनी क्र. ०२२-२७४५२७७८ फॅक्स-०२२-२७४६७४४०) महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागातील खात्याकडील नोंदणीकृत कंत्राटदारांला योग्य त्या कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) मागविणेत येत आहे. सदरची ऑनलाईन ई-निविदा सूचना www.mahapwd.com and www.mahatenders.gov.in पोर्टलवरती उपलब्ध आहे.

टिप- या निविदेमध्ये एकूण २ काम समाविष्ट असून ऑनलाईन निविदा विक्री व बीड प्रिपरेशन दिनांक ०९.१२.२०२४ सकाळी १०.०० ते दिनांक २३.१२.२०२४ रोजी सायंकाळी १८.०० पर्यंत संकेतस्थळावर उपलब्ध करुन देणेत आलेली आहे. www.mahatenders.gov.in

**ई-निविदा जा.क्र./सा.बां./पनवेल/ कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. विभाग, पनवेल, जि. रायगड**
**दिनांक : ११/१२/२०२४**

**सही/-**
**कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग,**
**पनवेल**



## जाहीर नोटीस

सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड यांचे समोर
महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दाखल दावा
**थकीत कर्ज फेडीची अंतिम नोटीस**
**संस्थेचे नाव :- केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**

या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील थकबाकीदारांकडून केशवस्मृति नागरी सहकारी पतपेढी मर्यादित. पनवेल, या संस्थेकडून घेतलेल्या कर्जापैकी मुद्दल व्याज धरुन त्यांच्या नावासमोर दाखविलेली एकूण रक्कम येणे आहे व ती सर्व थकीत झालेली आहे. दिलेल्या मुदतीत संपूर्ण कर्जाची व व्याजाची थकीत कर्जफेड करण्यात कसूर केल्याने तुमचे विरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ नुसार संस्थेने या कार्यालयाकडे दावा दाखल केलेला आहे. आपण या कार्यालयाने वेळोवेळी आयोजित केलेल्या सुनावणीस गैरहजर होता. या जाहीर नोटीसीद्वारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असून सदर दाव्याबाबत अंतिम सुनावणी दि. १९/१२/२०२४ रोजी दुपारी ११.३० वाजता ठेवण्यात आली असून सदर सुनावणीस आपण न चुकता उपस्थित रहावे. आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणणे ऐकून घेतले जाणार नाही.

| अनुक्रमांक | दावा क्रमांक | कर्जदाराचे नांव | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १ | २२६/२०२४-२५ | श्री. संतोष साहेबराव गव्हाणे | ३०४, ए-४, लक्ष्मीनगर सी.एच.एस., विहीघर, पो- नेरे, ता. पनवेल-४१०२०६ | रु.१,७७,६१८/- |
| | | (श्री. संतोष साहेबराव गव्हाणे, यांचे जामिनदार) | | |
| | | श्री. अशोक महादेव पांडुळे | ३०३.ए-५, लक्ष्मीनगर सी.एच.एस., विहीघर, पो- नेरे, ता. पनवेल-४१०२०६ | |
| | | श्री. हरिश्चंद्र हौसाराव तावरे | सखाराम पाटील चाळ, खोली क्र.४, प्लॉट नं- ४७७ ब, भगतवाडी, सुकापूर, नविन पनवेल, ता. पनवेल-४१०२०६ | |
| २ | २२१/२०२४-२५ | श्री. अभिजीत विनायक दातार | श्री साई नारायण बिल्डिंग, परदेशी आळी, पनवेल-४१०२०६ | रु. ५३,१४२/- |
| | | ( श्री. अभिजीत विनायक दातार, यांचे जामिनदार) | | |
| | | श्री. प्रशांत प्रभाकर लाड | ४०२, इंद्रलोक, स्वामी नित्यानंद मार्ग, पनवेल-४१०२०६ | |
| | | श्री. दिपक अंबादास लष्करे | ४०३ ए, गोविंद सागर सी.एच.एस., साईनगर, पनवेल-४१०२०६ | |

सदरची नोटीस माझे सही शिक्क्यानिशी दिली आहे.

**३२५६ जा क्र सनिप/वि-२/क्र१०१/जा.नो/ केशवस्मृती/सन २०२४**
**दि ०९/१२/२०२४.**

**सही/-**
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था पनवेल, जि. रायगड**

## निवडक

### बालकामगार ठेवल्याने गुन्हा

**नवी मुंबई :** बालकामगार ठेवल्याने कंपनीच्या महिला ठेकेदारावर गुन्हा दाखल केला आहे. तुर्भे एमआयडीसी पोलिसांच्या पाहणीत हा प्रकार उघड झाला आहे. तुर्भे एमआयडीसी परिसरातील स्विजेरा लॅब या आस्थापनेत बालकामगार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून तुर्भे एमआयडीसी पोलिसांच्या पथकाने शनिवारी ठिकाणी जाऊन कामगारांची पडताळणी केली. त्यामध्ये दोन कामगार हे १७ वर्षांचे असल्याचे आढळून आले. ठेकेदाराने त्यांना कामावर ठेवले होते. त्यानुसार संबंधित महिला ठेकेदारावर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### मसाज पार्लरच्या नावाने देहविक्री

**नवी मुंबई :** देहविक्री चालवणाऱ्या मसाज पार्लरवर पोलिसांनी कारवाई केली आहे. या प्रकरणी चौघांवर एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. गॅलरीया मॉलमधील मसाज पार्लरमध्ये देहविक्री चालत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने पामबीच गॅलरिया मॉलमधील अजुरो स्पा या आस्थापनेत बनावट ग्राहक पाठवून खात्री केली. त्यामध्ये तिथला अवैध धंदा उघड होताच छापा टाकून कारवाई केली. याप्रकरणी स्पा चालक रूपेश डोंगरे याच्यासह चौघांवर एपीएमसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

### लोकशाही दिनी पाच अर्ज प्राप्त

**नवी मुंबई :** कोकण विभागीय लोकशाही दिन कोंकण भवनमध्ये तहसीलदार (सामान्य प्रशासन) महेंद्र बेलदार यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी नागरिकांनी आपल्या तक्रारी मांडल्या. त्यांच्या समस्या जाणून प्रकरणे उचित कार्यवाहीसाठी संबंधित कार्यालयांकडे पाठविण्यात आली. या वेळी विभागीय स्तरावरील विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. कोकण विभागीय स्तरावर आतापर्यंत झालेल्या लोकशाही दिन कार्यक्रमात एकूण प्रलंबित अर्जांची संख्या १२ असून आलेल्या अर्जांची संख्या पाच आहे, असे एकूण प्राप्त अर्ज १७ होते त्यापैकी सात अर्ज निकाली काढण्यात आला आहे. त्यापैकी १० अर्ज प्रलंबित आहेत.

### रेटिंगच्या मोहापायी गमावले १८ लाख

**नवी मुंबई :** ऑनलाईन रेटिंग देऊन झटपट पैसे कमवण्याच्या प्रयत्नात तरुणाने १८ लाख रुपये गमावले आहेत. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्याने पोलिसांकडे तक्रार केली आहे. त्यावरून वाशी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला असून अधिक तपास सुरू आहे. वाशी परिसरात राहणाऱ्या २६ वर्षीय तरुणांसोबत हा प्रकार घडला. तो वाशीतच कामावर असताना त्याला ऑनलाईन पैसे कमवण्याचा मॅसेज आला होता. रेटिंग देऊन पैसे कमवण्यासाठी त्याने १८ लाख रुपये संबंधितांच्या खात्यावर पाठवले. त्यानंतर मात्र अधिक पैशाची मागणी होऊ लागल्याने व गुंतवलेलेदेखील पैसे परत देण्यास टाळाटाळ होऊ लागल्याने फसवणूक झाल्याचे त्याच्या लक्षात आले.

# नवी मुंबईत नागरी सुविधांना प्राधान्य

## विभाग प्रमुखांच्या बैठकीत आयुक्तांनी घेतला नियोजित प्रकल्पांचा आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेचे लोकार्पण झालेले प्रकल्प, इमारती उपयोगात असल्याची खात्री संबधित विभागाने करून घ्यावी व अद्याप कार्यान्वित न झालेल्या नागरी सुविधा तत्परतेने वापरात येतील याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे आणि याबाबतचा आढावा घेऊन त्याचा तपशील सादर करावा, असे निर्देश देत नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी विभागप्रमुखांच्या आढावा बैठकीत सद्यस्थितीत सुरू असलेल्या व नियोजित असलेल्या सुविधा कामांचा आणि प्रकल्पांचा आढावा घेतला.

मालमत्ता विभागाने महानगरपालिकेच्या पूर्ण झालेल्या मात्र सध्या वापरात नसलेल्या इमारती, वास्तू अशा मालमत्तांची यादी त्वरित तयार करावी आणि वापरात नसलेल्या वास्तू वापरात येण्यासाठी संबधित विभागांशी समन्वय साधावा आणि मालमत्ता वापरात येण्याच्या दृष्टीने पुढाकार घेऊन काम करावे असे आयुक्तांनी निर्देशित केले.



### पावसाळ्यापूर्वी कामांचे नियोजन

अनेक मोठे प्रकल्प व सुविधा कामांसाठी केंद्र सरकारमार्फत निधी उपलब्ध होतो. त्याची माहिती घेऊन हा निधी प्राप्त करून घेण्याबाबत संबंधित विभागांनी कार्यवाही करावी व या माध्यमातून नागरिकांना उत्तम गुणवत्तापूर्ण सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ठोस प्रयत्न करावेत, असेही आयुक्तांनी निर्देश दिले. पावसाळ्यापूर्वी करावयाच्या कामांचे आत्तापासूनच नियोजन करावे, असेही आयुक्तांमार्फत निर्देश देण्यात आले.

या वास्तू तत्परतेने वापरात आणण्याची जबाबदारी संबधित विभागप्रमुखाची राहील, असे स्पष्ट करीत आयुक्तांनी त्यातही प्राधान्याने तयार असलेले मार्केट वापरात येतील याकडे प्राधान्याने लक्ष द्यावे, असे निर्देश दिले.

दिव्यांग व्यक्ती, महानगरपालिकेच्या इटीसी केंद्रातून व्यवसाय प्रशिक्षित झालेले दिव्यांग तसेच महिला बचतगट यांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना खात्रीशीर बाजारपेठ मिळण्याच्या दृष्टीने महानगरपालिकेच्या मार्केटमधील किमान ३० टक्के जागा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याचे निर्देश आयुक्तांनी दिले.

मार्केटप्रमाणेच व्यावसायिक गाळे, कार्यालयासाठी जागा, समाजमंदिरे, पाळणाघर, विरंगुळा केंद्रे अशा विविध मालमत्ता वापरात आणण्यासाठी संबधित विभागप्रमुखांनी तत्पर कार्यवाही करावी असे निर्देश आयुक्तांनी दिले. या बाबीकडे नियमित लक्ष देता यावे व त्यावर नियंत्रण रहावे यादृष्टीने ऑनलाईन पोर्टल तयार करावे, असेही सूचित करण्यात आले.

सर्व विभागांनी त्यांच्यामार्फत सद्यस्थितीत सुरू असलेली कामे व करावयाची नियोजित कामे यांचा आढावा घ्यावा आणि त्यांच्या कार्यपूर्ततेच्या कालावधीवर अर्थात टाईमलाईनवर लक्ष द्यावे, असे निर्देश देतानाच सुविधापूर्तीसाठी महसूल हा महत्वाचा भाग असल्याने करवसूलीकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या. त्यामध्ये मालमत्ताकर हा उत्पन्नाचा सर्वात मोठा स्त्रोत असल्याने उद्दिष्ट साध्य करण्यासाठी वसूलीचा प्राधान्यक्रम ठरवून पावले उचलावीत असे स्पष्ट केले. विभाग कार्यालय स्तरावर काम करणाऱ्या मालमत्ता कर विभागाच्या अधिकारी, कर्मचारी यांनी आपले संपूर्ण लक्ष करवसूलीवर द्यावे, असे सूचित करतानाच या कर्मचाऱ्यांना करवसूली व्यतिरिक्त इतर कामे देण्यात येऊ नयेत, असे आयुक्तांनी स्पष्ट केले.

हापालिकेने ई – ऑफिस कार्यप्रणाली सुरु केली असून यापुढील नवीन सर्व नस्ती या ऑनलाईन कार्यप्रणालीद्वारे निर्माण कराव्यात व सर्व विभागांनी ई – ऑफिस कार्यप्रणालीचा प्रभावी वापर करावा, असे आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिले. त्याचप्रमाणे महापालिकेमार्फत नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या सर्व लोकसेवा ऑनलाईन उपलब्ध करून द्याव्यात व त्या महाराष्ट्र शासनाच्या 'आपले सरकार' पोर्टलशी जोडलेल्या असाव्यात, असे स्पष्ट करीत याबाबतची कार्यवाही शासनाच्या संबधित विभागाशी संपर्क साधून लवकरात लवकर करून घ्यावी, असेही आयुक्तांनी निर्देशित केले.

या वेळी अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, शहर अभियंता शिरीष आरदवाड व इतर विभागप्रमुख उपस्थित होते.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आविष्कार फेरी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महाविद्यालयीन अविष्कार फेरीचे आयोजन केले होते.

मुंबई विद्यापीठाने आयोजित केलेल्या रिसर्च आविष्कार कन्वेंशन २०२४-२५ स्पर्धेसाठी महाविद्यालयात सर्व शाखेतील प्रथम, द्वितीय व तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी रिसर्च अविष्कारसाठी निवडलेले वेगवेगळे विषय व त्या विषयाची असणारी तयारी यासाठी महाविद्यालयात महाविद्यालयीन फेरीचे आयोजन केले होते त्यामध्ये सुमारे २८ ग्रुपचा समावेश होता प्रत्येक ग्रुपमध्ये कमीत कमी दोन ते तीन विद्यार्थ्यांचा समावेश होता व त्या विद्यार्थ्यांनी परीक्षकांच्या समोर चांगल्या पद्धतीने त्यांचे टॉपिक पीपीटीद्वारे सादर केले व त्यावेळी परीक्षकांनी काही सूचना दिल्या व त्या सूचनेनुसार विद्यार्थी त्यांच्या पोस्टरमध्ये तसेच पावर पॉइंट प्रेझेंटेशनमध्ये वेगवेगळे बदल करतील.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी सर्व विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाच्या रिसर्च आविष्कार कन्वेंशन फेरीसाठी शुभेच्छा दिल्या. या अविष्कार महाविद्यालयीन फेरीचे आयोजन प्रा. डॉ. दीपिका हसीजा यांनी केले तसेच प्रा. प्रथमेश उदेकर, प्रा. प्रथमेश ठाकूर, प्रा. मनीषा शिलेदार, प्रा. रेवण शिंदे, प्रा. डॉ. पूजा लांजेकर, प्रा. डॉ. स्वाती म्हातुर प्रा. नंदिनी सकपाल, प्रा. विशाल देशमुख व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उपस्थित राहून सहकार्य केले.



**पनवेल : भाजप कार्यकर्ते धनाजी पाटील यांना वाढदिवसानिमित्त तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच अनिल ढवळे आदी उपस्थित होते.**

# उलवे नोड येथे 'लाडक्या बहिणीं'ना साड्यांचे वाटप

**उरण : बातमीदार**



शिवसेना शिंदे गटाच्या माध्यमातून श्री साई मंदिर, सेक्टर ९ उलवे नोड येथे महिलांना साडी वाटप करण्यात आले तसेच महिलांच्या विविध योजना, उपक्रम या विषयी जनजागृती करण्यात आली. विविध विषयावर प्रबोधन करण्यात आले.

महायुतीचे सरकार महिलांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी प्रयत्नशील असून महिलांच्या उन्नतीसाठी शासन विविध योजना, उपक्रमांच्या माध्यमातून महिलांच्या विकासासाठी हातभार लावत आहे. म्हणून महिलांनी आता विकासासाठी एकत्र येण्याची गरज आहे. महायुतीने महिलांसाठी लाडकी बहीण योजना मोठ्या प्रमाणात राबविली. त्याला महिलांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

ज्या ज्या महिलांनी लाडकी बहीण योजनेसाठी नोंदविले नसतील त्यांनी आपले नाव त्वरित नोंदवावेत व या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवसेना शिंदे गटाचे पनवेल तालुका उपाध्यक्ष प्रवीण राम ठाकूर यांनी उलवे येथे केले. या वेळी महिला शहर प्रमुख सोनल घरत, उलवे शहर प्रमुख संदीप वायंगणकर, जीवन परसे (कळंबोली) तसेच इतर पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

या वेळी आगामी होणाऱ्या निवडणुकीत नगर परिषद, महानगर पालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद, ग्रामपंचायत निवडणुकीत महिला भगिनींनी महायुतीला मोठ्या प्रमाणात मतदान करावे. महायुतीचे प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात निवडून द्यावेत, असे आवाहन या वेळी करण्यात आले.

# उलवे रहिवासी संघटनेची महावितरणसोबत बैठक



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे रहिवासी संघटनेचे अध्यक्ष अवधेश महतो यांच्या नेतृत्वाखाली उलवे येथील महावितरणच्या मुख्याधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.

या बैठकीत उलवेतील जास्त वीजबिल किंवा अनेक ठिकाणी उघडे विजेचे खोके किंवा वारंवार वीज खंडित होण्याबाबत चर्चा करण्यात आली. या बैठकीत उलवे विभागीय अध्यक्ष अमर म्हात्रे, उलवे रहिवासी संघटनेचे उपाध्यक्ष अ‍ॅड. सुनील मौर्य, सचिव संकल्प घरत, उपसचिव देवालय मित्रा, सहसचिव अवनीश सिंग, सदस्य उदय पांडे, कपिल यादव, मनोज यादव, अजय जी आणि विविध सामाजिक संस्थांशी संबंधित सदस्यांनी उपस्थित होते.




**खारघर : बांगलादेशात अराजकता माजल्यानंतर हिंदू समाजावर मोठ्या प्रमाणात अन्याय आणि अत्याचार होत आहेत. अनेक मंदिरांची नासधूस होत आहे. याच पार्श्वभूमीवर रविवारी भारतीय जनता पक्षाच्या वतीने निषेध रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीमध्ये खारघरवासीय मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**




**नागोठणे : सामाजिक कार्यकर्ते नारायण तेलंगे यांची कन्या अश्विनी हिचा विवाह माणगाव बोर्ले येथील समीर गोपाल यादव यांच्याशी झाला. या वेळी वधू-वरास आशीर्वाद देण्यासाठी राष्ट्रवादीचे नेते दिलीप टके, नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनचे संस्थापक शामकांत नेरपगार, अध्यक्ष अ‍ॅड. महेश पवार, सहसचिव तथा वृत्तपत्र एजंट राजेंद्र जोशी, पवन पोलसानी, उदंड रावकर आदी उपस्थित होते.**

# रायगड किल्ल्याच्या कामासाठी जिल्हा प्रशासनाने प्राधिकरणाशी समन्वय राखावा -खासदार संभाजीराजे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रायगड किल्ला व परिसर पर्यटन विकासाचे काम उत्तम दर्जाचे व जलदगतीने व्हावे यासाठी जिल्हा प्रशासनाने प्राधिकरणाशी समन्वय राखून काम करावे. यासाठी शासनद्वारे मंजूर झालेला निधी १०० टक्के खर्च होईल यासाठी योग्य नियोजन करावे, अशा सूचना रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदार छत्रपती संभाजीराजे भोसले यांनी केले.



खासदार छत्रपती संभाजीराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली कोकण भवन येथील आयुक्त कार्यालयाच्या मुख्य दालनात आज रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटन आराखडा प्राधिकरणाची आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस कोकण विभागाचे महसूल आयुक्त डॉ. राजेश देशमूख, रायगड जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किशन जावळे, उपायुक्त (नियोजन) प्रमोद केंबावी, रायगडचे उप जिल्हाधिकारी डॉ. रवींद्र शेळके, महाडचे उपविभागीय अधिकारी ज्ञानोबा बानापूरे, रायगड पाणी संवर्धन विभागाचे अधिक्षक अभियंता संजय शिंदे, रोहाचे सहाय्यक वनसंरक्षक रोहित चोबे, पेण-रायगड विद्यूत विभागाचे कार्यकारी अभियंता संजिवनी कट्टी तसेच प्राधिकारणाशी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

रायगड किल्ला संवर्धन व किल्ल्याच्या आजूबाजूचा परिसर पर्यटनाच्या दृष्टीने विकसीत करण्यासाठी शासनाद्वारे निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यानूसार आराखडा तयार करण्यात आला असून आराखडयातील कामांची अंदाजपत्रके तयार करून निविदा प्रक्रीय पूर्ण झाल्या आहेत. या वेळी रायगड किल्ला व परिसर विकास पर्यटनाची कामे उत्तम दर्जाची आणि जलद गतीने होण्यासाठी उपसमिती गठीत करण्याच्या सुचना आराखडा प्राधिकरणाचे अध्यक्ष खासदर छत्रपती संभाजी राजे भोसले यांनी संबंधितांना दिल्या.

या बैठकीत किल्ल्यांचा इतिहास जिवंत करून दाखविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून शिवसृष्टी निर्माण करण्यात येणार असल्याबाबतचे सादरीकरण करण्यात आले. यात रायगड किल्ल्यावर प्राचिन वस्तूंचे संवर्धन, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यटकांना मनोरंजनासह गड-किल्ल्यांची माहिती उपलब्ध करून देण्यात येणार आहे. किल्ल्यावरील सर्व वस्तूंचे माहिती संग्रहण करण्यात येणार आहे. रायगड किल्यावरील चित्त दरवाजा, नाना दरवाजा, खुबल्दा बुर्ज, महादरवाजा आदींचे संवर्धन व जिर्णोद्धार करणे, तसेच पर्यटक व शिवप्रेमींना रायगडावर पोहचण्यासाठी मजबूत पायवाटा निर्माण करणे, स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी आदी महत्वाच्या सोयी उपलब्ध करून देणे, जलसंवर्धन करणे याबाबींचा समावेश आहे. याशिवाय पाचाड येथील राजमाता जिजाऊ समाधी व जिजामाता वाडा यांच्या संवर्धन व जिर्णोद्धाराचे कार्य करून देण्याचे प्रस्तावीत आहे.

प्रगत संगणन विकास केंद्र (सीडॅक) द्वारे आधूनिक तंत्रज्ञानाचा वापर करून पर्यटकांच्या मार्गदर्शनासाठी विविध प तयार करण्यात येणार आहेत. तसेच व्हिज्यूअल तंत्रज्ञानाचा वापर करुन पर्यटकांना गड-किल्ले आणि इतिहासातील माहिती देण्यासाठी विविध ठिकाणी दालने तयार करण्यात येणार आहेत. याचे प्रारुप स्वरुपाचे सादरीकरण प्रगत संगणन विकास केंद्र (सीडॅक)च्या अधिकाऱ्याव्दारे याबैठकीत करण्यात आले.

या बैठकीत रायगड जलसंधारण विभागाद्वारे रायगड किल्ला, शिवसृष्टी आणि परिसरातील गावांसाठी भविष्यात ३० वर्षे पूरेल या दृष्टीकोनातून पाण्याचे नियोजन करण्यासाठी आराखडा तयार करण्यात आला आहे. त्या आराखड्याचे सादरीकरण या वेळी करण्यात आले.

# उत्कृष्ट आणि गुणवत्तापूर्ण घरकुलामुळे माणगाव तालुका राज्यात अग्रेसर

**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव तालुका घरकुल योजनांच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी राज्यात अग्रेसर ठरत आहे. राज्य शासनाने प्रधानमंत्री जनमन आवास योजना व रमाई घरकुल योजना यांसारख्या योजनांद्वारे गोरगरिबांना निवारा मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली आहेत. १३७९ घरकुलाला मंजुरी देण्यात आली. पैकी ३२९ घरकुले बांधून पूर्ण झाली आहेत. उर्वरित १०५० घरकुले प्रगती पथावर आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात माणगाव तालुका घरकुल योजनेत अग्रेसर ठरला

माणगाव तालुक्यात ७४ ग्रामपंचायती असून तालुक्यात घरकुलासाठी २०५३ लाभार्थांचा सर्व्हे करण्यात आला. त्यापैकी १९१८ पात्र लाभार्थी ठरविण्यात आले. तर १३५ ऑनलाईन अपात्र लाभार्थी ठरविण्यात आले. यामधून १३७९ घरकुलाला मंजुरी देण्यात आली. पैकी ३२९ घरकुले बांधून पूर्ण झाली आहेत. उर्वरित १०५० घरकुले प्रगती पथावर आहेत. त्यामुळे रायगड जिल्ह्यातच नव्हे तर राज्यात माणगाव तालुका घरकुल योजनेत अग्रेसर ठरला असून या घरकुलांमुळे अनेकांच्या स्वप्नांची दारे उघडली आहेत.





घरकुल योजनां अंतर्गत गरजू कुटुंबांना त्यांच्या स्वप्नातील घर बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य, वेळोवेळी केलेले तांत्रिक मार्गदर्शन आणि संपूर्ण पाठबळ यामुळे केवळ कुटुंबाला निवारा मिळत नाही, तर त्यांच्या जीवनमानात सामाजिक फार मोठा बदल घडत आहे. कामांची गुणवत्ता व पारदर्शकता ही या कामाची कसोटी होती. माणगाव तालुक्यातील घरकुल योजनेच्या अंमलबजावणीत गुणवत्ता हा महत्त्वाचा धागा पकडून प्रत्येक घरकुल बांधकामामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, दर्जेदार बांधकाम, साहित्य, आणि योग्य मोजणीसह कामाची अंमलबजावणी झाल्याचे चित्र दिसते. स्थानिक प्रशासनाने या शासनाच्या घरकुल योजने मध्ये पारदर्शकतेसाठी विशेष प्रयत्न केले आहेत. लाभार्थ्यांच्या निवड प्रक्रियेपासून काम पूर्ण होईपर्यंत सर्व कामे डिजिटल पद्धतीने नोंदवली गेली असुन लाभार्थ्यांना प्रोत्साहन देऊन त्यांचा यामध्ये सहभाग वाढवत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण केला त्यामुळेच या लाभार्थ्यांनी बांधलेले स्वतः चे घर सुरेख आणि दर्जेदार आहे.

माणगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप जठार यांनी लोकसहभाग आणि स्थानिक रोजगाराच्या पलीकडे जाऊन ' आपलं घर सुंदर घर ' ही संकल्पना या तालुक्यात राबवल्यामुळे घरकुल योजना केवळ निवाऱ्याचे साधन नाही, तर ती तालुक्यातील लोकांना रोजगार देणारी संधी ही ठरली आहे. माणगाव तालुक्यातील घरकुल योजनेमध्ये ठेकेदारा मार्फत न बांधता, संबंधित लाभार्थ्यांनी स्वतःचं घर स्वतःच बांधायचं असा कानमंत्र देत ही घरे सहभागातून उभी केली. लाभार्थ्यांना बांधकाम साहित्य खरेदीत येणाऱ्या अडचणी कौशल्याने सोडवत, त्यांना बांधकाम साहित्य वेळोवेळी पुरविण्यासाठी मोठे योगदान दिले आहे.

आज माणगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये हजारो गरजू कुटुंबे कच्च्या घरांमध्ये राहतात. पावसाळ्यात गळणारी झोपडी, उन्हाळ्यात तापणारी कौलारू टिनाची छप्परे किंवा वादळात उडणाऱ्या झोपड्यांपासून मुक्तता झाल्याने त्यांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल घडविण्यासाठी माणगाव पंचायत समितीने टाकलेलं हे एक सकारात्मक पाऊल आहे. या घरांमुळे मुलांच्या शिक्षणासाठी अनुकूल वातावरण तयार झाले आहे.

माणगाव तालुका आता घरकुल योजनांच्या माध्यमातून राज्यासह अन्य तालुक्यांसाठी आदर्श ठरत आहे. या योजनेमुळे केवळ माणगाव नव्हे, तर संपूर्ण राज्याचा विकास साधता येईल, अशी स्थानिक लोकांची भावना आहे.

### घरकुलांची आकडेवारी

*राज्यात सोळा जिल्ह्यामध्ये शासनाच्या आकडेवारीनुसार बांधण्यात आलेल्या रायगड जिल्ह्यात ७०६ घरकुलात पुढे आहे. तर पालघर ६५०, यवतमाळ २४५, नांदेड १२८, नाशिक ९६, गडचिरोली ८३, रत्नागिरी ६५, ठाणे ४८, सातारा २१, अमरावती २०, पुणे ११, वर्धा ११, चंद्रपूर १०, अहमदनगर ३, सिंधुदुर्ग ०, कोल्हापूर ०., जिल्ह्यात एकूण ७०६ घरकुले बांधून पूर्ण झाली. त्यांपैकी माणगाव ३२९, सुधागड ६२, मुरुड ४८, तळा ४५, कर्जत ४३, अलिबाग ३१, पनवेल ३१, पेण २२, रोहा २१, महाड २१, पोलादपूर १९, श्रीवर्धन १३, उरण ११ म्हसळा ७, खालापूर ३.*

माणगाव तालुक्यातील घरकुल योजनांची ही यशस्वी वाटचाल माणगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी जठार यांनी केलेले योग्य नियोजन तसेच ग्रामपंचायत मधील सर्व ग्रामविकास अधिकारी, विस्ताराधिकारी, कर्मचारी यांना विश्वासात घेऊन शासकीय वेळे व्यतिरिक्त सुट्टीच्या दिवशीही लोकसेवकांची जबाबदारीचे धडे त्यांच्यात रुजवत लाभार्थी ग्रामस्थांच्या लोकसभागातून आणि प्रशासनाचा पारदर्शक दृष्टिकोन यामुळे अनेकांच्या स्वप्नातली घरे पूर्ण झाली त्याचा आनंद आजही लाभार्थी कुटुंबाच्या चेहऱ्यावर दिसून येत आहे.

**शासनाची प्रधानमंत्री जनमन आवास योजना हि आदीवासी वंचित गरजू लाभार्थापर्यत पोहोचवून कमी वेळात लाभार्थांना लाभ मिळवून देण्यासाठी जिल्ह्यात सकारात्मक दृष्टीकोनातून काम चालू आहे. त्यामुळे लाभार्थांना निवाऱ्याची सोय झाली आहे. माणगाव पं. स. गटविकास अधिकारी व ग्रामविकास अधिकाऱ्यांनी उत्तम नियोजन करून ही योजना प्रभावी राबविली. त्यांचे कौतुक करावे तेवढे थोडे अन्य तालुक्यात ही सकारात्मक दृष्टीकोन ठेवून करण्याचे काम सुरु आहे. या योजनेमुळे आदिवासींच्या सर्वांगीण उन्नतीत होईल**
**–प्रियदर्शनी मोरे, प्रकल्प संचालक, ग्रामीण विकास यंत्रणा रायगड**

## २५० गावकऱ्यांनी गुलाबी थंडीत केली भात झोडणी

### खारअंबोलीत सामुदायिक शेती

**मुरुड : प्रतिनिधी**

कोकणात शेतीचा कल कमी होत आसताना रायगडमध्ये मुरुड तालुक्यात खारआंबोली गावात २५० गावकऱ्यांनी देवळासमोरील शेतीत भात लावणी पारंपरिक गीते बोलत केली आज आलेल्या भाताची सामुदायिक झोडणी करून १०० किलोची ९२ पोती भात समाजासाठी जमा केले अशी माहिती माजी सरपंच मनोज कामाने यांनी दिली .

गावागावातील मतभेद विसरून गावच्या शेतात हाक दिल्याबरोबर पुरुष सकाळी ७ वाजल्यापासून कामाला येतात. झोडणी काम लवकर व्हावे म्हणून पारंपरिक पद्धत आजही वापरतात कोणत्याही मशीनचा वापर करत नाही गावातील मंडळी कुशल कामगार असल्याने बाहेर दिवसाला १ हजार मजुरी घेणारे देखील गावच्या झोडणीच्या कामाला स्वतःहून हजार राहतात उद्धेश असतो मतभेद विसरून आनंदात माणुसकीची मूल्य जपण्याचा असतो .महिला पुरुषांना टोमणे मारतात .तर पुरुष महिलांना मुंबईला जातो असे टोमणे मारून सगळ्यांच्या चेहऱयावर हसू आणतात अशी परंपरा कोठे पाहायला मिळत नाही ,त्यासाठी हे गाव प्रसिद्ध आहे.

मजुरीने माणसे घेऊन शेतीची कामे जोरकसपणे सुरू आहेत.पावसाचा अनियमितपणा असला तरीआता पावसामुळे शेत जमिनीत ओसाड होऊ देत नाही पावसाची अजूनही गरज असून त्यावरच भात शेतीची मदार आहे.तालुक्यात ३ हजार हेक्टर जमिनीवर भात शेती केली जाते.

भात पीक हे मुख्य पीक आहे.खारआंबोळी गावची शेती सर्वात शेवट लावतात .कारणं अनेक ठिकाणी अति पाऊसाने गावकऱ्यांचे राब वाहवून जातात. त्यामुळे गावची शेती लावून झाल्यावर उरलेले राब गावकर्यांना देण्यात येते असा सार्वजनिक हिताचा विचार हा गाव जपतो .येथिल लावणी पाहण्यासाठी पर्यटक देखील आवर्जून भेट देतात



## 'स्नेहसंमेलनातून कलाकार घडतो'

**मुरुड : प्रतिनिधी**

स्नेहसंमेलन हे विद्यार्थ्यांच्या कलागुणाना वाव देतेच पण त्यातून एक कलाकार घडत असतो आज मी मुरुड मधल्या भावी कलाकार होऊ पाहणाऱ्या चिमुरड्यांचा नृत्याविष्कार पाहून दंग झालो.असे रायगड जिल्ह्यातील नृत्य अविष्कारात पारंगत असलेले अमोल कापसे यांनी मार्निंग स्टार प्री पायमरी व प्रायमरी स्कूल या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्यावेळी बोलताना सांगितले.

जंजिरा विद्या मंडळ संचलित मार्निंग स्टार प्री पायमरी व प्रायमरी स्कूल या शाळेच्या वार्षिक स्नेहसंमेलनाच्या विविध गुण दर्शन कार्यक्रम जंजिरा विद्या मंडळाच्या उपाध्यक्षा प्रतिभा जोशी यांच्या उपस्थितीत रायगड जिल्ह्यातील नृत्य अविष्कारात पारंगत असलेले अमोल कापसे यांचे हस्ते श्रीफळ वाढवून उद्घाटन करण्यात आले या वेळी संस्थेचे अध्यक्ष सुधाकर दांडेकर ,सचिव चंद्रकांत अपराध ,संचालक प्रमोद भायदे ,अभय दिवेकर ,उदय दांडेकर,पांडुरंग आरेकर ,शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे मार्निंग स्टारच्या मुख्याध्यापिका मानसी नाईक शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष शाहू काळे सर्व स्टाफ तसेच विद्यार्थी व पालकवर्ग मोठ्या संख्वेने उपस्थित होते



मार्निंग स्टारच्या प्री प्रायमरी व प्रायमरी स्कूलच्या विद्यार्थ्यांनी गरबा,बंगाली,भांगडा,कोळी, लावणी असे नृत्य प्रकार तसेच प्रदूषण जन जागृती असे विविध कार्यकम उत्कृष्ठ पणे सादर करून प्रेक्षकांची मने जिंकली असे अमोल कापसे यांनी नमूद करून विद्यार्थ्यांचे कौतुक केले त्याचप्रमाणे छोट्या विद्यार्थ्यांचा अभूतपूर्व नृत्य अविष्कार पाहून मला माझ्या बालपणात डोकावण्यात भाग पाडले खरच या शाळेतील सर्व मॉर्निंग स्टार म्हणजेच ही पुढची पिढी संस्कारा बरोबर कला ही जपते हे पाहून अशा शाळांचे व शिक्षकांचे कौतुक जितके करावे तितके कमी असे आपल्या मनोगतात सांगूननमन नृत्य ग्रुप अलिबाग यांस कडून सर्वोत्कृष्ठ नृत्य अविषकरास चषकदेण्याचे जाहीर केले

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मानसी नाईक ,शिल्पा मसाल,वैशाली म्हात्रे , आत्मजा आगलावे, समृद्धी माळी ,ज्योती पाटील, तांबे मॅडम यांनी मेहनत घेतली असून सूत्रसंचलन महेश भोईर यांनीकेले असून अधिश्री जोशी यांनी आभार प्रदर्शन केले.

## समाजाचे दर्शन घडविणारे साहित्य हवे -न्यायमूर्ती अंबादास जोशी

**माणगाव : प्रतिनिधी**

जोपर्यंत आम्ही साहित्य पाहत नाही तोपर्यंत आम्हाला समाजाचे दर्शन होत नाही असे प्रतिपादन निवृत्त न्यायमूर्ती तथा गोवा लोकायुक्त अंबादास जोशी यांनी माणगाव येथील अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयात पुस्तक वितरण कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

ॲड.विलास पाटणे लिखित प्रतिभा आणि प्रतिमा हे चरित्रात्मक पुस्तक सर्वोच्च न्यायालयाचे न्या. अभय ओक तसेच मुंबई उच्च न्या.मकरंद कर्णिक, न्या.माधव जामदार,न्या.अनुजा प्रभू देसाई यांच्या उपस्थितीत प्रकाशित झाले. या पुस्तकाचा वितरण सोहळा अंबादास जोशी यांच्या हस्ते व पुस्तकाचे लेखक ॲड. विलास पाटणे यांच्या उपस्थितीत शनिवारी (दि.७) झाला.

या कार्यक्रमास माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अँड.राजीव साबळे व माणगाव वकील संघटनेचे अध्यक्ष अँड.महेंद्र मानकर अशोकदादा साबळे विधी महाविद्यालय माणगाव चेअरमन अँड.विनोद घायाळ,प्राचार्य डॉ. सोनाली बुरटे,सरकारी वकील अँड.योगेश तेंडुलकर,अँड. सुजित मेहता,अँड.देवदत्त ठाकूर,अँड.अनिकेत ठाकूर आदी मान्यवरांसह अशोकदादा साबळे विधी महाविद्यालयाचे विध्यार्थी मोठया संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना निवृत्त न्यायमूर्ती तथा लोकायुक्त गोवा आंबादास जोशी यांनी निष्णांत न्यायमूर्ती,न्यायाधीश व वकिलांचे उदाहरण देते ते पुढे म्हणाले कि,आजच्या विध्यार्थ्यांनी वाचन व लेखनावर अधिकतम भर देणे गरजेचे आहे. तुमचे वाचन जास्तीत जास्त असेल तर एखाद्या विषयावर खोलपर्यंत तुम्हाला जात येईल. वकील हा समाजातील कुठल्याही विदवान व्यक्तीपेक्षा शतप्रभू आहे. कायद्याची प्रत्येक तरतूद हि जिवंत झऱ्या सारखी आहे. असे सांगत सर्वानी साहित्य वाचनावर अधिकाधिक भर देऊन त्यातून आपला व्यक्तीमत्व विकास साध्य करा असे सांगत अँड.विलास पाटणे लिखित प्रतिभा आणि प्रतिमा हे पुस्तक आपल्या सर्वांसाठी मार्गदर्शनपर असल्याचे सांगितले.

पुस्तकाचे लेखक अँड. विलास पाटणे यांनी आपल्या मार्गदर्शनात बोलताना सांगितले कि, माझ्या पुस्तकात न्याय व्यवस्थेची माहिती दिली असून याचा तुम्हा सर्व विध्यार्थ्यांना नक्कीच फायदा होईल. आपल्याकडे गुणवत्ता,विश्वासार्हता,निस्पृहता या तीन गोष्टी असतील तर आपण याकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहू शकतो. जोपर्यंत आपल्याकडे विश्वासार्हता आहे तोपर्यंत लोकशाही टिकून राहील असे त्यांनी सांगून प्रख्यात न्यायमूर्ती,न्यायाधीश,वकील यांनी हाताळलेल्या विविध प्रकरणांची उदाहरणे उपस्थितांसमोर ठेवली.





## रोहा शेतकरी प्रतिष्ठानचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**धाटाव : प्रतिनिधी**

रसायन सगळ्यात असते. अति प्रमाणात मीठही विष आहे. प्रत्येकासाठी प्रमाण महत्त्वाचा आहे. त्यामुळे शेती, झाडांना योग्य प्रमाणातला रासायनिक खतांचा वापर चुकीचे ठरवता येणार नाही. नैसर्गिक, सेंद्रिय शेतीचा गवगवा असला तरी कृषी क्षेत्रात विकसीत विज्ञान अपरिहार्य आहे. त्यामुळे रासायनिक खतांचा निवडीतला योग्य वापर महत्त्वाचा घटक ठरतो. मात्र प्रामाणिकता गरजेचे आहे असे अभ्यासू प्रतिपादन एसआरटी तंत्र, सगुणा बाग कृषी पर्यटनाचे जनक कृषीरत्न चंद्रशेखर भडसावळे यांनी रोहा येथे केले.

रोहा तालुका शेतकरी विकास प्रतिष्ठान आयोजित ८ वा वर्धापन दिन, दिनदर्शिका प्रकाशन, शेतकरी सन्मान कार्यक्रमात उपस्थित शेतकऱ्यांना कृषीरत्न चंद्रशेखर भडसावळे यांनी मौलिक मार्गदर्शन केले. व्यासपीठावर पशुसंवर्धन माजी उपयुक्त सुभाष म्हस्के, कृषी अधिकारी महादेव करे, कृषी विज्ञान केंद्राचे समन्वयक डॉ मनोज तलाठी, प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत, सलाम रायगडचे संपादक राजेंद्र जाधव, रायगड मजूर फेडेरेशनचे चेअरमन हेमंत ठाकूर, बळीराजा फांऊडेशनचे अध्यक्ष विठ्ठल मोरे, ग्रोवेल फार्मर प्रोड्युसरचे संचालक नितीन पिंपळे, बिजामृत फार्मचे चेअरमन भारत पाटील, स्वाध्याय फार्मरचे चेअरमन राम गीजे, केव्हीके शास्त्रज्ञ जीवन आटेकर, उपाध्यक्ष अनंत मगर व मान्यवर उपस्थित होते.



यावेळी राजेंद्र जाधव यांनी तुकडाधारी शेतकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही, मोठ्या शेतकऱ्यांना लाभ मिळतो. त्यासाठी निकष बदलणे गरजेचे आहे असे सांगत तरुणांत शेतीची आवड निर्माण करण्यासाठी प्रभावी प्रयत्न गरजेचे आहे असे मत व्यक्त केले. शेतीचे उत्तम नियोजन केल्यास नुकसान कधीच होणार नाही. एका दाण्यापासून शेकडो दाणे तयार करण्याची किमया निसर्गात आहे. केवळ शेतीसाठी सर्वकश व्यवस्थापन हवे, त्यासाठी आम्हीही आपल्या सोबत आहोत अशी टिप्पण डॉ. तलाठी यांनी केली तर कृषी अधिकारी महादेव करे यांनी कृषी विकासात रोहा तालुका आघाडीवर येत आहे. कृषी संबंधी सर्वाधिक पुरस्कार रोहा तालुक्याला मिळाले. याचा मनस्वी आनंद आहे. असे सांगत अनेक कृषी योजनांना परामर्श करे यांनी या वेळी घेतला.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत यांनी आपण शेतीकडे कसे वळतो. बघता बघता कृषी योजनांचा सार्वत्रिक पातळीवर स्वीकार केला. प्रतिष्ठानच्या अनेक शेतकऱ्यांना कृषी विभागाचे पुरस्कार मिळाले, हे आपले सामुहिक यश आहे अशी व्यक्त केली

कृषीरत्न चंद्रशेखर भडसावळे यांनी सगुणा बाग एमआरटी तंत्रज्ञानाची माहिती दिली. उत्पादन खर्च अगदीच कमी करण्याचा तंत्र एसआरटीत आहे. आज बहुसंख्या शेतकरी एसआरटी तंत्राने शेती करत आहे असे सांगत सगुणा बाग विकासाचे तंत्र समजावून सांगितले. कार्यक्रमात कृषीनिष्ठ शेतकरी धनंजय जोशी कृषीभूषण सेंद्रिय शेती संतोष दिवकर, कृषीभूषण अनंत भोईर, जिजामाता कृषी भूषण प्राची शेपुंडे यांचा सन्मान चंद्रशेखर भडसावळे व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

## जिल्हा युवा महोत्सवात समूह लोकगीत व समूह लोकनृत्यामध्ये 'प्रिझम' प्रथम

**रायगड : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक सेवा संचालनालयानेआयोजीत केलेल्या जिल्हा युवा महोत्सवात समूह लोकगीत व समूह लोकनृत्यात प्रिझमने प्रथम क्रमांक पटकवला

क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, रायगड- अलिबाग, नेहरू युवा केंद्र,रायगड अलिबाग, माय भारत रायगड अंतर्गत जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन पी.एन. पी.कॉलेज, अलिबाग या ठिकाणी करण्यात आले होते.यावेळी प्रिझम संस्थेच्या कलाकारांनी पारंपारिक मंगळागौर सादर करीत लोकनृत्य या प्रकारात प्रथम क्रमांक पटकावला तर लोकगीतात भारुड सादर करीत उपस्थितांची मने जिंकत प्रथम क्रमांक पटकावला असून मुंबई विभागीय युवा महोत्सवात प्रिझम संस्थेचे कलाकार रायगडचे नेतृत्व करतील.

प्रथम क्रमांकाचे पारितोषिक जिल्हा क्रीडा अधिकारी राजेंद्र अतनुर, परीक्षिका प्राजक्ता कोकणे, ऍड कलाताई पाटील, वंदना आंब्रे, क्रीडा अधिकारी दिपाली बोडके, क्रीडा अधिकारी अंकिता मयेकर यांच्या हस्ते देण्यात आले.

या युवा महोत्सवात मोठ्या प्रमाणात युवक युवती सहभागी झाल्या होत्या.



# डब्ल्यूटीसी : दक्षिण आफ्रिका अग्रस्थानी

## श्रीलंकेविरुद्धच्या विजयामुळे भारतासह ऑस्ट्रेलियाची कोंडी



**केपटाऊन : वृत्तसंस्था**

दक्षिण आफ्रिकेच्या संघाने घरच्या मैदानात सुरू असलेल्या श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेतील दुसरा आणि अखेरचा सामना जिंकून वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप फायनलसाठी आपली दावेदारी आणखी भक्कम केली आहे. भारतीय संघाला पराभूत करून अव्वलस्थानी विराजमान झालेल्या ऑस्ट्रेलियाला खाली खेचत दक्षिण आफ्रिकेचा संघ आता डब्ल्यूटीसी गुणतालिकेत टॉपला पोहचला. दुसरीकडे दोन कसोटी सामन्यातील पराभवानंतर श्रीलंकेचा संघ जवळपास स्पर्धेतून आउट झाला आहे.

श्रीलंकेविरुद्धच्या दमदार कामगिरीनंतर दक्षिण आफ्रिकेच्या संघाने १०पैकी सहा विजय, तीन पराभव आणि एक अनिर्णित सामन्यासह ७६ गुण कमावले आहेत. त्यांच्या विजयाची टक्केवारी ६३.३३ टक्के अशी आहे. स्वबळावर फायनल गाठण्यासाठी दक्षिण आफ्रिकेला आता फक्त पाकिस्तानविरुद्धच्या मालिकेत दबदबा कायम राखायचा आहे. पाकिस्तानविरुद्ध दोन्ही कसोटी सामने जिंकण्यात दक्षिण आफ्रिकेचा संघ यशस्वी ठरला तर ते वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या फायनलसाठीच्या शर्यतीत टॉपला कायम राहतील.

दक्षिण आफ्रिकेच्या संघाने अव्वलस्थानावर खाली खेचल्यामुळे आता वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपमधील आव्हान कायम ठेवण्यासाठी ऑस्ट्रेलियन संघाला टीम इंडियाविरुद्ध उर्वरित तीन कसोटी सामन्यांपैकी किमान दोन सामने जिंकावे लागतील. एवढेच नाही तर श्रीलंका दौऱ्यावरील दोन सामन्यांच्या मालिकेत त्यांना २-० असा विजय नोंदवावा लागेल. भारत-ऑस्ट्रेलिया बॉर्डर गावसकर कसोटी मालिका २-२ अशी बरोबरीत सुटली तर ऑस्ट्रेलियाला टीम इंडियापेक्षा पुढे राहण्यासाठी श्रीलंकेविरुद्ध किमान एक सामना जिंकावा लागेल.

भारतीय संघाकडे आता फक्त तीन सामने उरले आहेत. या सर्व सामन्यात टीम इंडियासमोर ऑस्ट्रेलियाचे आव्हान आहे. उर्वरित तिन्ही सामने जिंकून भारतीय संघ तिसऱ्यांदा डब्ल्यूटीसी फायनलमध्ये खेळू शकतो. दोन कसोटी सामन्यातील विजय आणि एक सामना अनिर्णित राखूनही टीम इंडियाला फायनलमध्ये एण्ट्री मिळू शकते, पण ऑस्ट्रेलियाविरुद्धची मालिका २-२ अशी बरोबरीत राहिली तर टीम इंडियासाठी डोकेदुखी वाढेल, कारण या परिस्थितीत ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंका यांच्यातील दोन्ही सामने अनिर्णित राहिले तरच टीम इंडियाचा फायनलचा मार्ग मोकळा होईल. या परिस्थितीत भारत आणि ऑस्ट्रेलिया दोन्ही संघाचे विनिंग पर्सेंटेज ५५.२६ टक्के असे बरोबरीत राहिले. तरी मालिका विजयाच्या आधारावर टीम इंडियाला ऑस्ट्रेलियावर बाजी मारता येईल.

## मॉडर्न स्कूलच्या क्रीडा महोत्सवास प्रारंभ



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील मॉडर्न स्कूलच्या ४५व्या वार्षिक क्रीडा महोत्सवाला सोमवार (दि. ९) पासून सुरुवात झाली. आंतरराष्ट्रीय भलाफेकपटू आनंद जितेकर यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलित करून महोत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

विद्यालयाच्या प्रांगणात झालेल्या उद्घाटन समारंभात मान्यवरांच्या हस्ते क्रीडा ध्वज फडकविण्यात आला. या वेळी विद्यालयातील चारही कुलातील कुलप्रमुखांना विद्यार्थ्यांनी मानवंदना दिल्यानंतर खेळाला सुरुवात झाली.

या वेळी नवी मुंबई वेल्फेअर फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष गणेश पाटील, प्राचार्य सुमित्रा भोसले, विद्यालयाचे सर्व विभागप्रमुख, क्रीडा शिक्षक, पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी आंतरराष्ट्रीय भलाफेकपटू आनंद जितेकर यांनी सांगितले की, मनापासून मेहनत केली की, सर्व काही साध्य करता येते. त्यासाठी स्वतःचा आत्मविश्वास महत्त्वाचा असतो. स्वतःला कधी कमी लेखू नका तसेच आई-वडिलांची समाजात मान कशी उंचावेल यासाठी प्रयत्न करा आणि गुरुजनांना आदर द्यायला शिका.

या कार्यक्रमाचे औचित्य साधून विविध स्पर्धांमध्ये प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

## रायगडचा क्रिकेटपटू ऋषिकेश नाईक निवृत्त

**खोपोली : प्रतिनिधी**

टेनिस बॉल क्रिकेटमध्ये रायगड जिल्ह्यासह परदेशातही नावलौकिक असलेला पनवेल तालुक्यातील वहाळ गावचा सुपरस्टार खेळाडू ऋषिकेश कुमार नाईक याने खारघर येथे झालेल्या रायगड प्रीमिअर लीग टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या वेळी आपली निवृत्ती जाहीर केली.



३७ वर्षीय ऋषी नाईक हा सिव्हिल इंजिनिअर असून सिडकोमध्ये सहाय्यक कार्यकारी अभियंता पदावर कार्यरत आहे. आपल्या तडाखेबंद फलंदाजीमुळे प्रसिद्ध असणाऱ्या ऋषीने आतापर्यंत अनेक स्पर्धेत सामनावीर, उत्कृष्ट फलंदाज व मलिकावीराचे किताब पन्नासपेक्षा जास्त वेळा पटकावले आहेत. त्याच्या नावावर आतापर्यंत चार दुचाकी बाईकस् मालिकावीराचे पारितोषिकदेखील आहेत. आपल्या वहाळ गावच्या व व्यावसायिक संघासाठी त्याने २२ वर्ष योगदान दिले आहे.

सिडकोसाठी टाइम्स शिल्ड, कांगा लीगसारख्या लेदर बॉल क्रिकेट स्पर्धांमध्येसुद्धा ऋषी खेळत आहे. हरहुन्नरी गुणवंत खेळाडू म्हणून त्याची ख्याती आहे. निवृत्ती जाहीर केल्यानंतर माध्यमांशी बोलताना ऋषी खूप भावूक झाला. त्याने सर्व सहखेळाडू, प्रेक्षक, हितचिंतकांनी दिलेल्या आजवरच्या प्रेमाबद्दल आभार मानले. यापुढे आपण फक्त व्यवसायिक लेदर बॉल क्रिकेट खेळणार असून रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या युवा व होतकरू खेळाडूंसाठी योगदान देणार असल्याचे त्याने सांगितले.

## राज्यस्तरीय लाठी स्पर्धेत अलिबागचा डंका

**रेवदंडा : महेंद्र खैरे**

पाचवी राज्यस्तरीय लाठी स्पर्धा गोव्यात नुकतीच झाली. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक कामगिरी करीत १५ सुवर्ण, तीन रौप्य आणि दोन कांस्यपदके जिंकली.

आठ वर्षाखालील मुलींच्या गटात रूद्रा अंकिता विनय पिंपळकर हिने तीन सुवर्ण, अवनी पाटील, सिमरन ठाकूर, ऋचा पाटील, ओवी भिंवडे, आराध्या नखाते, शिवम संदेश गुंजाळ यांनी प्रत्येकी दोन सुवर्ण, श्लोक जाधव एक सुवर्ण व दोन रौप्य, अर्णव पाटील सुवर्ण, श्रेयस म्हात्रे रौप्य, पवित्र मुरूम कांस्यपदक असे यश खेळाडूंनी मिळवले.



या सर्व विद्यार्थ्यांना साउथ एशियन पंच प्रियंका गुंजाळ यांचे तसेच वेदांत सुर्वे, शुभम नखाते यांचेही मार्गदर्शन लाभले. लाठी असोसिएशन अलिबाग रायगडचे अध्यक्ष प्रमोद मसाला यांनी यशस्वी खेळाडूंचे अभिनंदन केले.

## सहकार नगर संघ कै. रामकृष्ण पालांडे स्मृती चषकाचा मानकरी



**खोपोली : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील ग्रामीण क्रिकेट टेनिस सामन्यांना सुरुवात झाल्याने खेळाडूंमध्ये नवचैतन्य पसरले आहे. कै. रामकृष्ण पालांडे, लहू अर्जून पिंगळे यांच्या स्मरणार्थ अविनाश पालांडे यांनी भव्य दिव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन श्री दत्त क्रिकेट संघ घोडीवली-कांढरोली आणि मित्र परिवाराच्या वतीने करण्यात आले होते.

या चार दिवसीय स्पर्धेत प्रथम क्रमांक सहकार नगर, द्वितीय धामणी, तृतीय माडप, तर चतुर्थ क्रमांक घोडीवली संघाने पटकावला. सर्व विजेत्या संघांना घोडीवली ग्रामस्थ व प्रमुख अतिथींच्या हस्ते रोख रक्कम आणि आकर्षण चषक देऊन गौरवण्यात आले. त्याचप्रमाणे उकृष्ट फलंदाज, गोलंदाज, मालिकावीर खेळाडूंना आकर्षक ट्रॉफी देण्यात आली.

स्पर्धेवेळी अविशान पालांडे अतुल पिंगळे, सोहम पिंगळे, रोहिदास पिंगळे, रवी भोपी, अनिल, समीर पवार, बाबू पारंगे, प्रशांत पिंगळे, सुभाष दुधावडे, अरुण पिंगळे, संजय सोलंकी उपस्थित होते. अनेक सामाजिक, राजकीय, क्रीडाप्रेमी पाहुण्यांनी उपस्थिती दर्शवत खेळाडूंचे कौतुक केले.







कळंबोली शहर मंडल सरचिटणीस

**संजय दोडके**

यांना वाढदिवसाच्या

**हार्दिक शुभेच्छा!**

भाजपा

सौजन्य : रविशेठ पाटील, दिलीप बिष्ट



जीवेत् शरदः शतम्!

**संदेश नाईक**

यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक

सुरज जाधव



वर्ष ४१ वे ॥ॐ श्री बाळकृष्णाय नमः ॥ स्थापना १९८३

**मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोदशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह**


**श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर**

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ भाऊसाहेब महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ गिरीमल्लेश्वर महाराज की जय ॥

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ बाळकृष्ण महाराज की जय ॥ राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज की जय ॥


राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज की जय ॥ श्री. स.स. प्रेमचैतन्य महाराज की जय ॥

गुरु चरणी ठेवीता भाव । आपोआप भेटे देव ॥









अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री समर्थ सदगुरु बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर व स्वानंद सुखनिवासी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदिरामध्ये श्री.स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर, यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरू चरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचे पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ॥१३॥, शके १९४६, शुक्रवार दि. १३/१२/२०२४ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ॥१५॥ पोर्णीमा शके १९४६, रविवार दि. १५/१२/२०२४ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागातील गुरूबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

**नित्याचे कार्यक्रम**

| सकाळी | सकाळी | सकाळी | सकाळी | दुपारी | दुपारी | सायंकाळी | सायंकाळी | रात्री |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ ते ०६ | ०६ ते ०९ | ०९ ते १० | १० ते १२ | १२ ते ०१ | ०२ ते ०६ | ०६ ते ०७ | ०७ ते ०८ | ०९ ते ११ |
| काकड आरती | श्रीची नित्यपुजा | संगित भजन | प्रवचन | दुपारची आरती | संगित भजन | संध्याकाळची आरती | ग्रंथ वाचन व ध्यान | भजन व किर्तन |

**दैनंदिन कार्यक्रम**

**शुक्रवार दिनांक १३/१२/२०२४**

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० - भजन | **बाळकृष्ण महाराज संगीत भजन, न्हावेखाडी (उत्तरपाडा),** बुवा : गणपत ठाकूर, नितीन ठाकूर पखवाज : आत्माराम मोकल, जयराम म्हात्रे (न्हावा) |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | **श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर** श्री. भागवत साहेब, पुणे, ह.भ.प. आप्पा पांचाळ, चिपळून श्री. रमण ठाकूर, न्हावाखाडी, श्री. अरुणशेठ ठाकूर |
| दुपारी २ ते ४ - भजन | **भावभक्ति महिला भजन मंडळ, गव्हाण-खारकोपर** गायीका : सौ. रत्नप्रभा घरत, श्रीमती हिरुबाई घरत, सौ. चंद्रप्रभा घरत, सौ. आनंदी घरत श्री. गुरुकृपा प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर गायीका : सुप्रिया घरत आणि मंडळी पखवाज : तुषार घरत (चिर्ले उरण) |
| दुपारी ४ ते ६ - भजन | **संत जनाबाई प्रासादिक भजन मंडळ** गायिका : सौ. पुनम ठाकूर, सौ. रुपम वास्कर, हर्षद फडके, पखवाज : श्री. मधुकर धोंगडे, केतन फडके |
| सायं. ८ ते ९ - भजन | **दत्त प्रासादिक भजन मंडळ, खारकोपर** बुवा : वसंतशेठ पाटील, नितीन ठाकूर (खारकोपर) पखवाज : श्री. गौरव म्हात्रे, तुकाराम कोळी (गव्हाण) |
| रात्री ९ ते ११ - किर्तन | **श्री. ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज घाटाव (रोहा)** |
| रात्री ११ नंतर | **रात्रीचे बारा अभंग** |

**शनिवार दिनांक १४/१२/२०२४**

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० - भजन | **श्री. राधाकृष्ण भजन मंडळ, शिवाजीनगर** बुवा : रशिक कानडा आणि मंडळी पखवाज : कु. परितोष हातचांगे (बेलपाडा) तबला : रुतुजा कानडा |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | **श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर** श्री. भागवत साहेब (पुणे), ह.भ.प. आप्पा पांचाळ (चिपळूण) |
| दुपारी २ ते ४ | **श्री विश्वंभर भजन मंडळ, गव्हाण,** गायक : हेमंत कोळी पखवाज : प्रशांत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ४ ते ६ | **विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ, कोपर** गायीका : सौ. अनुसया घरत, सौ. इंदुताई म्हात्रे, सौ. नंदा पाटील, सौ. आनंदी घरत, सौ. अनिता म्हात्रे, सौ. वासंती ठाकूर. वादक : दिनेश घरत |
| रात्री ८ ते ९ - भजन | **एकादशी भजन मंडळ, न्हावे** बुवा : रामनाथ पाटील आणि मंडळी |
| रात्री ९ ते ११ - किर्तन | **श्री. ह.भ.प. प्रकाश महाराज पाटील आणि मंडळ,** कुंडेवहाळ |
| रात्री ११ नंतर | **रात्रीचे बारा अभंग, जागर भजन** रमन ठाकूर, शिवाजी ठाकूर, गजानन ठाकूर, पद्माकर ठाकूर (न्हावा खाडी), पांडूरंग रसाळ, आत्माराम मोकल, पद्माकर ठाकूर (शिवाजीनगर), किसन मोकल, मधुकर ठाकूर |

**रविवार दिनांक १५/१२/२०२४**

| | |
|---|---|
| सकाळी ८.०० ते १०.०० - भजन | **नादब्रम्ह साधना भजन मंडळ (रांजणपाडा - ओवेपेठ) देवसागर साधक समाज सामुदाईक संगित भजन** बुवा : निवृत्ती चौधरी, अक्षय चौधरी (रांजणपाडा), ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंतशेठ पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, सुरेश ठाकूर, डॉ. निवृत्ती म्हात्रे, रामनाथ पाटील, महेश पाटील (न्हावा), भाऊ ठाकूर (शिवाजीनगर). पखवाज : निलेश पाटील |
| सकाळी १० ते १२ - प्रवचन | **श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर** |
| दुपारी १२ वाजता | **श्री. बाळकृष्ण माऊलीवर पुष्पवृष्टी** |

- व्यवस्थापक -

**देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय), शिवाजीनगर - गव्हाण-खारकोपर न्हावे - न्हावेखाडी - (संचलित)**

- संयोजक -

**श्री. रामशेठ ठाकूर (मा.खासदार, रायगड), व परिवार आणि ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर**

कार्यक्रमाचे स्थळ : श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर, मु. शिवाजीनगर, पो.गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड. फोन नं. ९१६७९९१०४५

प्रसंगानुसार कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल । कार्यक्रमाच्या वेळेला महत्व दिला जाईल.